विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक पाचवा । मे २०२४



# महा. अंनिसचे विविध उपक्रम...



भंडारा येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर




चंद्रपूर येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर




लातूर येथे जिल्ह्याचा कुटूंब मेळावा संपन्न



चमत्कार सप्रयोग सादरीकरण करताना रविंद्र पाटील आणि विनायक सावळे



मुरबाड (ठाणे) येथील पोलीसांना निवेदन देताना ॲड. तृप्ती पाटील, विजय परब, परेश काटे, डॉ. सुषमा बसवंत व इतर कार्यकर्ते




कोराडी (नागपूर) पर्यावरणपूरक होळी उपक्रम राबवताना



अलिबाग (रायगड) पर्यावरणपूरक होळी उपक्रम राबवताना



रबाळे (नवी मुंबई) येथील शाहू महाराज विद्यालय येथे पर्यावरणपूरक उपक्रम राबवताना

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
संपादक मंडळ
• संपादक
डॉ. नितीन शिंदे
• कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड
• सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर
• व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर
• सदस्य
डॉ. मांतेश हिरेमठ
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
डॉ. सुशील मेश्राम
डॉ. अरुण शिंदे
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
• सल्लागार मंडळ
किशोर बेडकिहाळ
डॉ. प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार
• प्रकाशक
संजय बनसोडे
• कार्यालयीन पत्ता
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in
• अंक वितरण
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
• मुखपृष्ठ
प्रशीक पाटील/इस्लामपूर
• स्वागतमूल्य : ₹ २०/-
• पृष्ठ संख्या : ४०

वार्षिक वर्गणी
**४०० रू.** (व्यक्तीसाठी) **५०० रू.** (संस्थेसाठी)
वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :

विवेक जागर संस्था,
ICICI बँक, धुळे
खाते नंबर : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र
आम्ही वारस विवेकाचे
ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

R.N.I.No. MAHMAR/2022/83669
**वर्ष तिसरे । अंक पाचवा । मे २०२४**

## अनुक्रमणिका

• **संपादकीय...** ४
• **अभिवादन**
महात्मा बसवेश्वरांची लोकशाही : प्रारूप आणि प्रयास / डॉ. राजशेखर सोलापुरे ५
समाजातील अनिष्ठ चालीरिती बदलणाऱ्या : अहिल्याबाई होळकर/ रामभाऊ लांडे १०
• **कविता**
ठरव आता डोळस व्हायचं/उपेंद्र रोहनकर १२
• **प्रासंगिक**
स्वयंपूर्ण भारताचा पाया रचणारे नेहरू / हरिभाऊ सोळंके १३
• **बुवाबाजी**
स्मशानभूमीतील आघोरी प्रकार / संजय बनसोडे १७
• **चिकीत्सा**
शासनाचा पुरस्कार समाज कल्याणाला की अंधश्रद्धा प्रसाराला ? /दिगंबर कट्यारे १८
अंधश्रद्धेच्या गर्तेत राजकारण / सुशीला मुंडे २२
• **महिला विश्व**
मासिक पाळी : गरज साक्षरतेची/ डॉ. माधुरी झाडे २६
• **अहवाल**
उत्साहवर्धक विदर्भ दौरा/ माधव बावगे २९
संघटनेला बळ देणारा विदर्भ दौरा /विनायक सावळे ३०
• **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३३
• **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३७
• **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## चला, 'लोकशाही मूल्य संकल्पांची वीण' घट्ट करण्याचे आव्हान पेलू या..!

वर्तमानकाळात देशात निर्माण होत असलेली एकंदर परिस्थिती पाहाता आपण लोकशाहीची मजबूत असलेली वीण उसवत चाललो आहोत, असे म्हणता येण्याइतकी स्थिती नक्कीच बिकट झाली आहे. स्वातंत्र्यानंतर ज्या अथक अशा, हेतूपुरस्सर सामूहिक प्रयत्नांमधून घट्ट होत चाललेली लोकशाही मूल्यांची, लोकशाही मूल्यसंकल्पांची आणि कृतिकार्यक्रमांची वीण अचानकपणे गेल्या दीड दशकांपासून काहीशी उसवत चालल्याचे आपल्याला आता ठळकपणे जाणवू लागले आहे.

भारतीय म्हणून असलेली इथल्या नागरिकांची ओळख धूसर करून ती जात, धर्म, पंथ आणि गरीब–श्रीमंत या प्रकारच्या परिवेषात, एका अर्थाने, लोकशाही मूल्य संकल्पकृतींना घातक असणारी ओळख निर्माण केली जात आहे. इथला नागरिक हा आधीच इतक्या भेदांची विलग मानसिकता बाळगणारा आहे. त्यात भारतीयत्व या मूल्यामुळे काही एकजिनसीपणा येऊन आपण भारतातील सर्व लोक एक आहोत, ही भावना नुकतीच वाढून स्थिरावत चालली होती. परंतु अलीकडच्या टोकदार होत गेलेल्या धार्मिक अस्मितांमुळे परत हा एकात्मभाव झाकोळला गेला आहे. अशा परिस्थितीत आपण लोकशाहीची इमारत खिळखिळी करतो आहोत हे आपल्या सामान्यबुद्धीला कळतही नाही. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, रामराज्य हीच लोकशाही मानत आणि अमानवी बहुमतांच्या अहंताजन्य उक्ती–कृतींमुळे लोकशाही मूल्यसंकल्पांची वीण उसवून जात आहे. ही वीण नव्याने घट्ट करण्याचे आव्हान आज विवेकनिष्ठ लोकशाहीवाद्यांच्यापुढे उभे टाकले आहे.

इथल्या लोकांना भारतीयत्वाचा स्वीकार हा अत्यंत निष्ठापूर्वक करायला लावण्यासाठीची कोणतीच निष्ठावान संस्थात्मक यंत्रणा आणि मानसिकता आज निर्भयपणे पुढे येऊन काम करताना दिसत नाही. यात विवेकवाद्यांचा दोष नाही. देशात ज्या पद्धतीने लोकशाही मूल्यसंकल्पांचे दमन केले जात आहे, त्यात व्यक्तिगतपणे टार्गेट करून व्यक्तीलाच संपवण्याची खेळी खेळली जात आहे. शिवाय बहुसंख्यांकवादाने ज्या पद्धतीने विचारांच्या क्षेत्रातही दादागिरी निर्माण केली आहे, त्याचा हा परिणाम आहे. असे म्हणावे लागेल.

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे वैचारिक माध्यम अशाही परिस्थितीत संयत आणि मानवीयपणे लोकशाही मूल्यसंकल्पांची सकारात्मक मांडणी करत आहे, याचा आनंदच आहे; पण हे प्रयत्न पुरेसे नाहीत, याची जाणीवही आहे.

आपण विवेकी लोकशाहीवादी आहोत, याची कायम जाणीव ठेवत ही लोकशाही मूल्यांची वीण अधिक घट्ट करण्याचे प्रयत्न नक्कीच करत राहू. हे 'लोकशाही मूल्यसंकल्पांची वीण घट्ट करण्याचे' आव्हान आपण यथाशक्ती पेलत आहोत.. ते कायम पेलत राहू!

अतिथी संपादक

**डॉ. बाळू दुगडूमवार**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# महात्मा बसवेश्वरांची लोकशाही : प्रारूप आणि प्रयास

**डॉ. राजशेखर सोलापुरे** । लातूर
८३२९९५४३१५

लोकशाहीचा स्वीकार शासनप्रक्रियेत केला गेला म्हणून लोकशाही शासनपद्धती सुरू झाली, असे ढोबळपणे आपण म्हणत असतो. लोकशाही ही प्रौढमताधिकाराने जितक्या प्रमाणात अभिव्यक्त होते तितकीच ती लोकाभिमुख राजकारणाने आविष्कारित होते. राजकीय पातळीवर निवडणुकांत सर्वांना सहभागाचा हक्क प्रदान करण्याने किंवा स्वातंत्र्याचे संवैधानिक संहितीकरण करण्याने लोकशाही पूर्णपणे अस्तित्वात आली, असे म्हणणे भाबडेपणाचे ठरेल. सामाजिक व आर्थिक जीवनात जोपर्यंत अंतर्विरोधाची स्थिती आहे तोपर्यंत राजकीय लोकशाही निव्वळ बनाव मानावा लागेल. लोकशाहीचा संकुचित अर्थच गृहीत धरल्यामुळे लोकशाही राजकीय उपचारांचाच एक भाग बनून राहिली आहे. लोकशाहीचा खरा अन्वयार्थ समजून घेणे आवश्यक ठरते. लोकशाही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अवतीर्ण झाली तरच ती यशस्वी ठरू शकते. लोकशाहीचा अर्थ पंडित नेहरूंच्या शब्दांत सांगायचा झाला तर, मतदान, निवडणुका इत्यादी बाह्य उपचारांपेक्षा लोकशाहीचा अर्थ अधिकच सघन आहे. अंतिम दृष्टीने लोकशाही म्हणजे विचार करण्याची, आचाराची, शेजाऱ्यांशी वागण्याची एक पद्धती होय. शेवटी तुम्ही राजकीय नव्हे तर मानवी मूल्यांपाशी येता... हवे तर त्यांना सांस्कृतिक, चैतन्यशाली मूल्ये म्हणा. अशा चैतन्यशाली आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी लोकशाही महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात 'अनुभव मंटपा'च्या माध्यमातून निर्माण केली होती. सामूहिक अनुभव प्रज्ञेतून निर्माण केलेल्या 'वचनां'च्या सामाजिक विधिनियमांतून सामाजिक लोकशाहीचा आविष्कार घडविला.



**अनुभव मंटप : लोकशाहीनिष्ठ संस्था**

लोकशाहीला जीवनपद्धतीच्या स्वरूपात जीवनाच्या सर्व स्तरात अंमलात आणण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी रचनात्मक प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वर यांचा जीवनकाळ हा इ.स. ११०५ ते ११६७ होता. इ.स. ११४० ते ११६७ या २७ वर्षांत त्यांनी 'अनुभव मंटप' हा कृतिशील विचारमंच स्थापन करून तो आजच्या संसदीय कार्यप्रणालीनुसार चालविला. इंग्लंडमधील इ.स. १२१५ ला लागू झालेल्या मॅग्नाकार्टाच्या कितीतरी अगोदर भारतात संसदीय संस्थेची पायाभरणी अनुभव मंटपाद्वारे करून सामाजिक कायद्यांची निर्मिती बसवण्णांनी केली. ७७० शरण आणि शरणी (पुरुष आणि स्त्री सदस्यांना दिलेली संज्ञा) म्हणजेच सदस्यसंख्या असलेल्या अनुभव मंटपात ७० स्त्रियांना दहा टक्के इतके कायम प्रतिनिधित्व देणारे महात्मा बसवण्णा हे महिला सबलीकरणाचे आद्यप्रणेते ठरतात. ७७० सदस्यांचे हे अनुभव मंटप समाजातील भिन्न व्यवसाय करणाऱ्या लोकांची अनुभव सभा होती.

विचार, अभिव्यक्ती, संचार, व्यवसाय अशा सर्व स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करणारी अनुभव मंटप मध्ययुगामध्ये आधुनिक लोकशाहीची पायाभरणी करत होती. राजाचा राजदरबार आणि राज्यकारभारसुद्धा त्या काळात दुय्यम ठरावा, अशी स्थिती अनुभव मंटपाने निर्माण केली. कोणत्याही दंडशक्तीचा वापर न करता नैतिक मूल्यांच्या आधारे वचनांतून प्रगट झालेली जीवनमूल्ये सामाजिक जीवनाचा आधार बनली होती. संयुक्त राष्ट्रसंघटनेने १० डिसेंबर १९४९ ला जो मानवी हक्क जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्या जाहीरनाम्याचे पालन संपूर्ण जगभरामध्ये ज्या नैतिकतेच्या कर्तव्यातून केले जाते, त्याच भावनेने वचनांद्वारे निर्माण केलेल्या सामाजिक विधिनियमांचे पालन केले जात होते. सकल जीवात्म्यांचे कल्याण

करणारा विचार वचनांद्वारे मांडण्यात आला होता म्हणून तो सर्वमान्य ठरला होता.

संसदीय व्यवस्थेत जसे कायदे संमत होतात तसेच अनुभव मंटपात 'वचनसाहित्य' निर्माण केले जात होते. कायद्याप्रमाणेच 'वचन' हे देखील समाजातील व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करण्यासाठी व त्यांच्या वर्तनाला दिशा देण्यासाठी अस्तित्वात आलेले नियम होते. वचनांनी लोकांना जीवनमूल्ये व आचारधर्म दिला. कायद्याप्रमाणे वचनांचे लेखन केले जायचे. शांतरस नावाचा वचनभंडारी व ओलेय रामय्या यांनी चन्नबसवेश्वराच्या देखरेखीखाली अनेक कारकुनांकडून अनुभव मंटपातील २५५ शरण, शरणींची १६० कोटी वचने ताडपत्रावर लिहिली होती व जतन करून ठेवली होती. बाराव्या शतकातील ही वचने तत्कालीन समाजाचा लिखित कायदाच होती. महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेला अनुभव मंटप आधुनिक काळात निर्माण झालेल्या लोकशाही संस्थांची आद्यजननी होती.

**प्रजाप्रभुत्वाची विचारधारा**

बसवेश्वरांना प्रजेचे संपूर्ण प्रभुत्व समाज, राज्य, धर्म व अर्थ या सर्व संस्थांवर प्रस्थापित करावयाचे होते. बसवेश्वरांच्या साहित्याचे अभ्यासक रमजान दर्गा म्हणतात, बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्व संकल्पनेत स्वार्थ नाही, अहंभाव नाही आणि भ्रष्टता तर मुळीच नाही. प्रजासत्ताकापेक्षा श्रेष्ठ प्रजाप्रभुत्व आहे. सकल जीवात्म्याचे कल्याण इच्छिणारी संकल्पना या त्यांच्या प्रजाप्रभुत्वात दडलेली आहे. कारण प्रजासत्ताकामध्ये सत्ता आहे आणि सत्ता जेथे आहे तेथे स्वार्थ, अहंभाव, भ्रष्टाचार, खोटेपणा, हिंसा इत्यादी सर्व काही असल्याचे आपण सध्या पाहातच आहोत. ज्या काळात राजप्रभुत्व संपूर्ण जगभर मान्यता पावले होते त्या काळात महात्मा बसवेश्वर प्रजाप्रभुत्वाच्या माध्यमातून पर्यायी समाजाच्या रचनेचे स्वप्न पाहात होते. 'कायका'द्वारे (कायक – शारीरिक श्रम) श्रमप्रतिष्ठा आणि दासोहातून (दासोह – दान स्वीकारणाऱ्यास कनिष्ठ न समजता निरहंकार भावनेने दान करणे) सामाजिक जबाबदारी निर्माण करून प्रजेचे प्रभुत्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वाढीस लागावे यासाठी महात्मा बसवेश्वरांनी आग्रह धरला.

बसवेश्वर हे राजसत्ताक व्यवस्थेत एक प्रधानमंत्री होते. तरीही समाजावर कायद्याच्याआधारे वेगळे असे नियंत्रण निर्माण करावे असा अधिकार त्यांना नव्हता. लोकसत्ताक जीवनपद्धती मान्य करण्यास लोकांना ते भाग पाडू शकत नव्हते. तरी आपल्या अनुयायांना त्यांनी ही जीवनपद्धती समजावून सांगितली आणि तसे आचरण करण्याची शिकवण दिली. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा मुख्य विषय 'सामान्य माणूस' हा होता. सर्वसामन्यांच्या जीवनाचे चित्रण, त्यांचे प्रश्न वचनात दिसतात. महात्मा बसवेश्वर आपल्या एका वचनात प्रजाप्रभुत्वाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात, मोठा होण्याची इच्छा नाही, पामर राहाण्याची इच्छा आहे, खाली बसल्यावरच गाय दूध देणार. लोकशाहीमध्ये राज्यकर्त्यांनी सर्वसामान्य लोकांपेक्षा स्वतःला मोठे समजू नये, असे बसवेश्वर प्रस्तुत वचनात सांगतात. प्रजा ही गायीप्रमाणे असते. गायीचे दूध काढण्यासाठी खाली बसावे लागते. त्याचप्रमाणे विकास घडवून आणावयाचा असेल तर राज्यकर्त्यांनी स्वतःला मोठे न मानता प्रजेचे प्रभुत्व मान्य केले पाहिजे व त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे, असे मत ते यातून मांडतात.

महात्मा बसवेश्वरांचे प्रजाप्रभुत्व म्हणजे व्यष्टी व समष्टी यांना केंद्रबिंदू ठेवून केलेला विचार होय. त्यांनी जातिभेद, वर्णभेद, लिंगभेद, वर्गभेद, वंशभेद आणि व्यवसायभेद नसलेला नवा प्रजाप्रभुत्ववादी समाज निर्माण केला. मध्ययुगात धर्माच्या क्षेत्रात पुरोहितशाही वाढल्यामुळे व्यक्तीचे वैयक्तिक आणि धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले होते. तसेच राजसत्तेवर धर्माचे नियंत्रण होते. धर्मसंस्था राजदंडाचा वापर समतेऐवजी विषमतेसाठी करण्यात धन्यता मानत होती. महात्मा बसवेश्वरांनी या पुरोहितशाहीला नाकारले. 'लिंगायत' हा अवैदिक धर्म स्थापन करून समतेला महत्त्व देण्याचा प्रयत्न बसवण्णांनी केला. या संदर्भात डॉ. एस. एम. हुनशाळ म्हणतात, पुरोहित वर्गाच्या पंजातून सर्वसामान्य जनतेला मुक्त करून बसवेश्वरांनी पिळवणूकविरहित लोकशाहीप्रधान समाजरचनेची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्वात आधुनिक काळातील उदारमतवादी लोकशाही आणि समाजवादी लोकशाही या दोन्हींचा समन्वय साधला गेला होता. स्वातंत्र्य आणि समता ही दोन्ही मूल्ये समान स्वरूपात प्रजाप्रभुत्वाच्या

माध्यमातून अस्तित्वात आणून त्यांनी ही किमया साधली.

**स्वातंत्र्य : एक लोकशाही मूल्य**

व्यक्तीने किंवा समूहाने स्वतःच्या स्वत्वाचे दृढकथन करणे म्हणजे स्वातंत्र्य होय, ही सामाजिक शास्त्राच्या ज्ञानकोशातील स्वातंत्र्याची व्याख्या महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपात व वचनसाहित्यातून आविष्कारित केलेली होती. स्वातंत्र्याचा आज असलेला प्रगल्भ विचार बाराव्या शतकात मांडण्याचे कार्य बसववादाने केले होते. विचारस्वातंत्र्याची अनुभूती अनुभव मंटपातील ७७० शरणांनी घेतली होती. वचनांची निर्मिती हा वैचारिक स्वातंत्र्याचाच परिपाक होता. बसवेश्वरांनी अनुभवाधिष्ठित विचारस्वातंत्र्याची मांडणी केली. ते वचनात म्हणतात,

'अनुभवाविना भक्ती उपयोगी नाही
अनुभवाविना कोणतीही ज्ञानप्राप्ती होत नाही
आपल्यातील आपणास जाणून न घेता
शरणांच्या सत्संगाचा काय उपयोग?'

स्वविचार नसल्यास भक्ती व ज्ञानप्राप्ती होऊ शकत नाही, असे महात्मा बसवेश्वर म्हणतात. अनुभव म्हणजे केवळ शब्दमंथन नाही तर ती स्वातंत्र्याची उच्चप्राप्ती आहे. अनुभव मंटपात प्रत्येक स्त्री-पुरुष मुक्तविचार मांडत; तसेच वचनांचे लेखन करून लेखन स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोगही घेत. विचारस्वातंत्र्याबरोबर आचार स्वातंत्र्याविषयी मूलभूत विचार बसवण्णांनी मांडला आहे. ते वचनात म्हणतात,

'शरण मनाप्रमाणे वागण्यास स्वतंत्र आहेत
निवडक सदाचार साधना ते करतात.'

महात्मा बसवेश्वर सदाचाराचे पालन करणाऱ्यांना मनाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य बहाल करतात. दुराचार करणाऱ्यास ते स्वातंत्र्य नाकारतात. थोडक्यात, उचित बंधनासहित स्वातंत्र्य ही सकारात्मक स्वातंत्र्याची आजची संकल्पना बसवेश्वरांनी बाराव्या शतकात मांडली व ती समाजाने स्वीकारली. राजसत्ताक पद्धतीत पंतप्रधान असलेल्या बसवेश्वरांनी व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षणही जागरूकपणे केले. जागरुकता हीच स्वातंत्र्य संरक्षणाची पहिली अट असते. त्यामुळे बसवेश्वरांची व्यक्तिगत स्वातंत्र्याविषयीची जागरूकता त्यांच्यातील जागरूक नागरिकत्वाचे प्रतीक मानावे लागेल.

**समतावादी समाजरचना**

भारतीय विषमतापूर्ण सामाजिक संरचनेला आपल्या विचारातून, सामाजिक बदलातून हादरे देण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले. भारतात जे समतावादाचे विविध प्रवाह निर्माण झाले त्यात बसववादाचे फार मोठे योगदान आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेचा उद्घोष वचनसाहित्याने समर्थपणे केला. मनुस्मृतिनिर्मित वर्णव्यवस्थेच्या उगमाला विरोध केला. बसवेश्वरांनी कनिष्ठ जातीतील लोकांना उच्च जीवनानुभूती घेण्यासाठी पात्र मानले व बनविले. त्यांनी आपले गोत्र मातंग चेन्नय्या व डोहार कक्कय्याशी जोडून समतेचा संदेश दिला. आचार व विचार पद्धतीला महत्त्व द्यावे, जातिभेदाला थारा देऊ नये, असेही ते परखडपणे सांगतात. जातिभेद संपुष्टात आणण्यासाठी 'इष्टलिंग' हे प्रतीक निर्माण केले; जे समतेचे बोधचिन्ह होते. शरण-शरणींनी गळ्यात इष्टलिंग धारण करणे हे बसवेश्वरांनी समता प्रस्थापनेचे प्रतीक बनवले. बसवेश्वरांनी सामाजिक समतेचे तत्त्व मांडत असताना तत्कालीन परिस्थितीत नीच समजल्या जाणाऱ्या जातींशी आपले नातेसंबंध असल्याचे जाहीर केले व कर्मठांना, जातिभेदाचे पालन करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले. समतेसाठी रक्तसंकर होणे गरजेचे असते; हे बसवेश्वरांनी ओळखले होते. म्हणूनच ब्राह्मण मधुवय्याची मुलगी रत्ना (कलावती, लावण्या, वनजा) हिचा विवाह चांभार हरळय्याचा मुलगा शीलवंत याच्याशी लावला.

महारवाडा व शिवालयाची जमीन एकच, पाणी हे शौच्य आणि आचमनासाठी एकच, असे वचनात सांगून निसर्गनिर्मित वस्तूत मानवाने निर्माण केलेली विषमता बसवेश्वरांनी मुळासहित तार्किकतेने व आचरणातून खोडून काढली. अनुभव मंटपात व सार्वजनिक जीवनात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार देऊन आणि कायक तत्त्वात स्त्रियांना व्यवसाय स्वातंत्र्य देऊन बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानता स्वीकारली व ती समाजात रुजविली. विषमता निर्माण करणाऱ्या वैदिक धर्माचा त्याग करून बसवेश्वरांनी स्वतंत्र समतावादी 'लिंगायत' धर्म स्थापन केला. धर्माच्या क्षेत्रात स्त्री-पुरुष व व्यक्ती-व्यक्तीत समान दर्जा निर्माण करण्याचे कार्य लिंगायत धर्माने केले.

तत्कालीन परिस्थितीत सरंजामदार व राजदरबारातील लोकांना उच्च मानले जात असे व

सामान्य लोकांना हीन मानून विषमता निर्माण केली गेली होती. महात्मा बसवेश्वरांनी या राजकीय विषमतेला स्पष्टपणे नाकारत राजकीय मंडळींच्या विशेषाधिकाराला संपुष्टात आणण्याची भूमिका मांडली. राजकीय समतेचा विचार हा ज्या काळात कठीण होता त्या काळात राजकीय समता प्रस्थापित करण्याचे कार्य बसवेश्वरांनी केले. अनुभव मंटपात सर्व शरणांना व शरणींना राजकीयदृष्ट्या समान दर्जा व संधी होती. धर्म, जात, लिंग, वंश व आर्थिक आधारावर कसलाच भेदभाव न करता अनुभव मंटपात प्रतिनिधी निवडले गेले.

'कायक' तत्त्वज्ञानातून महात्मा बसवेश्वरांनी श्रमप्रतिष्ठेची आर्थिक समतेची नीती मांडली. व्यवसायामुळे निर्माण होणारी विषमता, शोषणाधिष्ठित समाजव्यवस्था नाकारण्याचे कार्य कायकाने केले. समाजातील प्रत्येक व्यक्तीने कायक केल्यास सर्व व्यक्ती कायकनिष्ठ म्हणून समान पातळीवर येतील व प्रत्येकाचा दर्जा समान होऊन समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पूर्ण होईल, अशी बसवेश्वरांची संकल्पना होती. कायक तत्त्वातच श्रमप्रतिष्ठेचा पुरस्कार करून बसवेश्वर, 'मेलेल्या गायीचे कातडे काढणारे मादार चेन्नया व कक्कय्या, मलिन वस्त्रे धुणारे मडिवाळ माचय्या यांना श्रेष्ठ मानतात,' मध्ययुगात कर्माने केलेले उच्च-नीच वर्गीकरण विषमतेचे मूळ बनले होते. बसवण्णांनी त्याचे खंडन करून प्रत्येक कायकाला (काम) महान मानले. लोकशाहीसाठी आवश्यक असणाऱ्या समतावादी समाजरचनेचे फक्त प्रारूपच महात्मा बसवण्णांनी मांडले नाही तर ते प्रत्यक्षात निर्माण केले, हे विशेष.

**बंधुता : लोकशाही जीवनपद्धतीचा मूलाधार**

बंधुता ही एकात्मता व व्यक्तिप्रतिष्ठा लोकशाहीत महत्त्वाची असते, याची कल्पना बसवेश्वरांना होती. म्हणूनच बसवेश्वर आपल्या वचनात एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीबद्दल आपलेपणा ठेवावा हा संदेश देतात. ते म्हणतात,

'हा कुणाचा, हा कुणाचा
हा (तो) कुणाचा असे नच म्हणवी.
हा आमचा, हा (तो) आमचा
हा (पलीकडचाही) आमचा
असे म्हणवी कुडलसंगमदेवा'

दुसऱ्याबद्दल परकेपणाची भावना निर्माण होऊ नये, तर प्रत्येकाबद्दल आपुलकी निर्माण व्हावी. प्रत्येकाला तो आपला आहे असे म्हटल्यास सर्वांमध्ये एकोप्याची म्हणजे बंधुतेची वृत्ती वाढीस लागते. अशी महात्मा बसवेश्वरांची शिकवण आहे. दुसऱ्या व्यक्तीचे स्वातंत्र्य मान्य करून सहिष्णुता बाळगल्यास बंधुता निर्माण होते हे तत्त्व महात्मा बसवेश्वरांनी मी लहान, शरण महान या वचनात सांगितले. इतरांपेक्षा स्वतःला लहान समजल्यास समाजात संघर्ष निर्माण होणार नाही. थोडक्यात 'आदर द्या, आदर घ्या,' अशी कृती प्रत्येकाने केल्यास बंधुतेची भावना निर्माण होते, हे बसवेश्वरांच्या विचारसरणीचे मूळ सूत्र आहे.

समाजात बंधुतेची भावना निर्माण करण्यासाठी महात्मा बसवेश्वर वचनातून म्हणतात की, नम्रतेने हात जोडून जवळ जाऊन वंदन करावे, विनयाने ध्यान देऊन 'भृत्याचार' (निरहंकार भावनेने मदत करणे) करावा. व्यक्तीव्यक्तीने नम्रतेने, विनम्रतेने परस्परांत संबंध जोपासले तर भृत्याचार निर्माण होईल, असे सूचक विधान महात्मा बसवेश्वर करतात. लोकशाही ही जीवनपद्धती निर्माण करण्यासाठी आणि यशस्वी करण्यासाठी माणसामाणसांतील बंध अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. यादृष्टीने महात्मा बसवेश्वरांनी बंधुतेच्या तत्त्वाची मांडणी केली.

**लोकसेवक : शासकाची भूमिका**

महात्मा बसवेश्वर हे शासक असले तरी ते शासकाच्या अनिर्बंध सत्तेला मान्यता देणारे शासक नव्हते. त्यांनी राजसेवकापेक्षा लोकसेवक भूमिकेला अधिक महत्त्व दिले. राजसत्ताक पद्धतीत पंतप्रधान असणारे बसवेश्वर राजेशाहीतील ऐषोआराम नाकारतात व म्हणतात, राजवाड्यातील महाराणी बनण्यापेक्षा भक्ताच्या घरची दासी होऊन राहाणे चांगले. सामान्य माणसाच्या सेवेत राहाणे महात्मा बसवेश्वर पसंत करतात. त्यांनी सरंजामदारी आणि हुकूमशाही नाकारून सामान्य जनतेच्या सेवेचे व्रत घेणारा शासक श्रेष्ठ मानला. त्यांच्या ह्या विचारात लोकशाही मूल्यव्यवस्था आढळून येते. संपत्ती आणि अधिकार यांची अपेक्षा न करता शासकाने सेवा करावी, असे विचार महात्मा बसवेश्वरांनी मांडले.

राजा काय म्हणतो याचा विचार सेवकाने करू नये

सामान्य लोकांनाच रत्न आणि मोती समजून निःस्वार्थ सेवा करावी; ज्यामुळे स्वार्थी राजकारण संपुष्टात येईल, ही भूमिका महात्मा बसवेश्वरांनी मांडली. 'समर्पण हेच जीवन' त्यांनी मानले. लोकसेवेसाठी सदैव तत्पर असून त्यातच जीवनाचे सार्थक मानणारा शासक त्यांना अभिप्रेत होता. शासकाने सदैव कार्यप्रवण राहावे, लोकांचे म्हणणे ऐकावे, लोकांच्या संकटसमयी लोकसेवक पोहोचू शकला नाही तर त्याने स्वतःला शासक म्हणवून घेऊ नये, अशी लोकसेवक शासकाची भूमिका मांडून महात्मा बसवेश्वरांनी कल्याणकारी राज्याचे आणि आदर्श राज्याचे व्यावहारिक प्रतिमान अंमलात आणले. लोकसेवक हाच लोकशाहीचा वाहक असतो, ही महात्मा बसवेश्वरांची धारणा आजच्या राज्यकर्त्यांनी समजून घेणे हे लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी गरजेचे आहे.

**उपसंहार**

राजेशाही व सरंजामशाही व्यवस्था नाकारून बसवेश्वरांनी सामान्यजनांना राजकीय व्यवस्थेत महत्त्व असले पाहिजे, अशी लोकशाहीनिष्ठ भूमिका मांडली आहे. बसवेश्वरांनी प्रचलित राजकीय व्यवस्थेचे समर्थन न करता नव्या राजकीय व्यवस्थेच्या रचनेचा सिद्धांत आपल्या राजकीय विचारातून प्रतिपादित केलेला आहे. बसवेश्वरांचा विचार हा Man, Movement Moral या तीन घटकांवर अवलंबून आहे. म्हणजे व्यवस्थेच्या केंद्रस्थानी माणूस असला पाहिजे, नैतिकता व्यवस्थेचा आधार असला पाहिजे आणि लोकआंदोलनाचा व्यवस्थेवर अंकुश असला पाहिजे, अशी भूमिका महात्मा बसवेश्वर मांडतात. अशी आदर्श लोकशाही शासनव्यवस्था त्यांना अपेक्षित होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या लोकशाही शासनपद्धतीच्या मूलतत्त्वांचे आपल्या विचारसरणीतून प्रतिपादन करताना त्यांनी प्रजाप्रभुत्वाचा सिद्धांत मांडून स्पष्टपणे लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. अनुभव मंटपातून ही लोकशाही व्यवस्था कार्यान्वित करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. भलेही त्यांना राजसत्ताक शासनपद्धतीच्या जागी लोकशाही प्रस्थापित करता आली नसली तरी लोकशाही जीवनपद्धती सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्तरावर त्यांनी अंमलात आणली. लोकशाहीचे प्रारूप आपल्या प्रयासातून पूर्णत्वाला नेत असताना शांततेच्या मार्गाने रक्ताचा एकही थेंब न सांडता त्यांनी लोकतंत्र प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, यालाच लोकतंत्रात्मक मार्गाने केलेली क्रांती म्हणता येईल. परंतु क्रांतीला निरस्त करण्यासाठी प्रतिक्रांतीचा मार्ग विरोधक चोखाळतच असतात तशी प्रतिक्रांती महात्मा बसवण्णांच्या काळातच राजसत्तेकडून केली गेली. मात्र लोकशाही क्रांतीची बीजे भारताच्या भूमीत बसवादि शरणांनी पेरली होती, ती स्वातंत्र्यानंतर संविधानाच्या रूपाने उगवली आणि भारतात लोकशाही व्यवस्था अंमलात आली. लोकशाही विचारांना प्रत्येक काळातच प्रतिकूलतेला सामोरे जावे लागते. अशावेळी लोकशाही मूल्यांना बळकट करण्यासाठी अधिकाधिक लोकशाहीचा आग्रह धरत राहाणे, हाच एकमेव मार्ग असतो.

**(लेखक लातूर येथे वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक असुन ते बसवेश्वरांच्या साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

●

## वाचक प्रतिक्रिया

एप्रिल महिन्यातील अंक चांगला माहितीपूर्ण झालेला आहे. यामध्ये सुशीलाताई मुंडे यांचा क्रीडा जगतातील अंधश्रद्धा यामुळे आम्हाला त्या घटनेची सविस्तर माहिती मिळाली आणि कशा प्रकारे या अंधश्रद्धेकडे वाटचाल सुरू आहे, याची खात्री पटली. यामुळे खेळाडूंच्या मनावर, प्रशिक्षकांच्या मनावर खूप वाईट परिणाम होत असणार. त्यांची कुचंबणा होत असणार पण यांना फक्त त्यांचे मते पूर्ण देशावरच लादायचे आहेत तर तिथे खेळाडू काय? काही दिवसांपूर्वी महिला खेळाडूंना त्यांच्यावर झालेल्या अत्याचार संदर्भात खूप मोठं आंदोलन करावं लागलं, अशा प्रकारे त्यांनी बरीच माहिती दिलेली आहे. विद्यार्थी आणि पालकांमधील अंधश्रद्धा यामध्ये संजय देशपांडे यांच्या लेखामुळे पण माहितीमध्ये भर पडली आणि बाकी लेखकांनी बाबासाहेबांवर लिहिलेले लेख पण माहितीपूर्ण आहेत, अशा प्रकारे हा अंक खूप चांगला झालेला आहे. संपादक मंडळाचे खूप खूप आभार. धन्यवाद!

**स्वाती बारी**, पुणे



# समाजातील अनिष्ठ चालीरिती बदलणाऱ्या : अहिल्याबाई होळकर

**रामभाऊ लांडे** । अंबड (जालना)
९४२१३४९५८६

अहिल्याबाई होळकर यांनी २८ वर्षे राज्यकारभार करताना अनेक नवीन सामाजिक बदल घडवून आणले. तसेच भेदाभेद करणाऱ्या प्रथा लाथाडून समाजाला दिशा देण्यासाठी, शिवाय महिलांना पुढे आणण्यासाठी प्रयत्न केला. स्त्री केवळ भोगवस्तू आहे, असा विचार करणाऱ्या समाजाची मानसिकता बदलण्यासाठी स्त्रियांना कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी दिली. एका पुरुषाच्या यशात स्त्रीचा वाटा असतो. याशिवाय प्रयत्न करणारी स्त्री पुरुषांच्या मदतीने यश मिळवू शकते. वेळप्रसंगी संकटात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खंबीरपणे उभी राहू शकते, असा सकारात्मक विचार स्त्रियांच्या मनामध्ये रुजवला. अहिल्याबाईंवर त्यांच्या सासुबाई श्रीमंत गौतमाबाई, हरकुबाई यांचा मोठा प्रभाव होता. त्यांना महिलांसाठी काम करताना नणंद उदाबाई वाघमारे यांची मोठी मदत झाली. मुलगा आणि मुलगी ही रथाची दोन चाके असून त्यांनी स्वतः सक्षम झाल्याशिवाय त्यांच्यावर राज्यकारभाराची जबाबदारी देता येणार नाही. म्हणून सासरे थोरले सुभेदार मल्हारराव होळकर यांनी मुलगा-मुलगी असा भेद न करता आपल्या मुलांना स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी देवून त्यांना मोकळीक दिली होती. अहिल्याबाई सून म्हणून आल्यानंतर त्यांना देखील पुढे आणण्याचे काम मल्हारराव आणि त्यांची पत्नी गौतमाबाईंनी केले.



सन १७५४ मध्ये खंडेराव होळकर यांच्या निधनानंतर अहिल्याबाई सती जाण्यासाठी निघाल्या होत्या. मात्र मल्हाररावांनी त्यांची समजूत काढून सतीचा निर्णय मागे घ्यायला लावला. होळकरशाहीचा डोलारा सांभाळण्यासाठी पुत्रवधू अहिल्याबाईंना थांबवून मल्हाररावांनी समाजात असलेल्या प्रथा आणि परंपरेत बदल केला. त्याचा मोठा परिणाम पुढे मराठेशाहीत दिसून आला. अहिल्याबाईंनी विधवा महिलांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार दिला. विधवांच्या संपत्तीवर फक्त त्या स्त्रीचा अधिकार असून ती दत्तक मूल घेवू शकते. यासाठी सरकारी खर्चाने दत्तकविधान लागू केले. यामुळे विधवा स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला. विधवा स्त्री आणि तिच्या संपत्तीचे संरक्षण करण्याचा हुकूम जारी करण्यात आला. दि.१४ जानेवारी १७६१ मध्ये पानिपत युद्धात धारातीर्थी पडलेल्या सरदारांच्या विधवा स्त्रिया व निराधार महिलांना अहिल्याबाईंनी कसण्यासाठी जमिनी तसेच विणकामाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांच्या मुलामुलींचे सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करून स्वतः त्यांचे लग्न करवून दिले. अनाथांची माऊली म्हणून अहिल्याबाईंनी या उपाययोजना केल्या आणि अमलात आणल्या, त्यामुळे अनेक निराश्रितांचा कल महेश्वरकडे होता.

अहिल्याबाई होळकर यांनी १० डिसेंबर, १७६७ रोजी होळकर राजगादीचा कारभार करण्यास प्रत्यक्षात सुरुवात केली. सासरे मल्हारराव होळकर आणि नातू मालेराव होळकर यांच्या दु:खातून स्वतःला सावरत असताना होळकरांचे फितूर दिवाण गंगोबा तात्या यांच्या मदतीने राघोबादादा पेशवे माळव्यावर चालून आले होते. राघोबा दादा कर्जबाजारी असल्याने त्यांनी होळकरांचे राज्य ताब्यात घेवून अहिल्याबाईंना तीर्थयात्रेला पाठवून द्यावे, असा सल्ला गंगाधर यशवंत चंद्रचूड यांना दिला होता. हा कट धारमध्ये रंगराव ओढेकर यांच्या मदतीने शिजला होता. रंगराव ओढेकर हा धारची गादी बळकावण्याच्या प्रयत्नात होता. त्यासाठी त्याने राघोबा दादाची मदत घेतली होती. राघोबादादाने फौज घेवून होळकरांच्या राज्यात प्रवेश करायचे असे ठरवून निघाला असता त्याच्या कारस्थानाची गुप्त बातमी

नणंद उदाबाई वाघमारे आणि शिवाजी गोपाळ यांनी अहिल्याबाईंना कळवली. दरम्यान, होळकरांची राजधानी इंदौरवरून महेश्वरला नुकतीच स्थलांतरित केली होती. तसेच होळकरांची फौज तुकोजीराव होळकर यांच्या नेतृत्वाखाली मोहिमेवर असल्याने महेश्वर येथे केवळ राखीव फौज होती. यावेळी अहिल्याबाईंनी महेश्वर आणि परिसरातील महिलांना तातडीने एकत्र करून आलेल्या प्रसंगाची जाणीव करून दिली. संकटाच्या काळात महिलांनी घरात न बसता आपल्या राज्याचे रक्षण करण्यासाठी पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. जमलेल्या महिलांची एकजूट पाहून त्यातील महिलांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या लगेच वाटून दिल्या.

काही महिलांना गुप्तहेर म्हणून पाठवले तर काही महिलांना महेश्वर किल्ल्यात तोफा चालवण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच अडगळीच्या वाटा बंद करून आदिवासी महिलांना शस्त्र देवून जांबघाट बंद केला. देपालपूरजवळ क्षीप्रेच्या काठावर घोडेस्वार महिलांची फौज उभी केली. दिमतीला बिजली आणि ज्वालाभवानी तोफा पाठवून दिल्या. शेजारच्या शासकांनादेखील राघोबादादांच्या कारस्थानाची माहिती देवून फौज पाठवण्याचे आवाहन केले. तुकोजीराव लगेच महेश्वरकडे रवाना झाले, महादजींनी राघोबांना थोरले सुभेदार मल्हाररावांच्या पराक्रमाची आठवण करून दिली. अहिल्याबाईंनी पुणे दरबारात पत्र पाठवून राघोबांच्या कारस्थानाची माहिती देताच माधवराव पेशवे यांनी अहिल्याबाईंना राज्यरक्षणाचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. तसेच राघोबादादांना पेशवे न समजता त्यांचेवर शत्रू म्हणून तलवार चालवावी, असे उत्तरादाखल पत्र पाठवून अहिल्याबाईंना पाठिंबा दिला. अहिल्याबाईंनी युद्ध जिंकण्याची तयारी करून पुन्हा राघोबादादास पत्र पाठवून सांगितले की, होळकरांचे राज्य हे पराक्रम, शौर्य, बलिदान आणि त्यागातून उभे राहिलेले आहे. त्याचे रक्षणासाठी आम्ही आमचे रक्त सांडायला तयार आहोत. युद्धभूमीत आम्ही स्वतः महिलांसोबत खांद्यावर बासडा घेवून तुमचे स्वागताला उभे राहू. या युद्धात आमचा पराभव झाल्यास समाज आम्हाला स्त्री समजून माफ करेल. मात्र तुम्हाला कुठेही तोंड दाखवायला जागा उरणार नाही. आमच्या पूर्वजांनी स्वराज्यविस्तारासाठी स्वतःचे रक्त सांडलेले आहे. त्यामुळे आम्हाला बलिदानाचा वारसा आहे, हे आपण विसरू नये. परिस्थितीचे गांभीर्य आणि अहिल्याबाईंचे पत्र वाचून राघोबांनी आपण युद्धासाठी येत नसून सांत्वनासाठी येत असल्याचे दुसरे पत्र पाठवून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. मात्र दरम्यान झालेल्या सर्व घटनांची माहिती देत राघोबांना स्वतःची चूक कबूल करण्यास भाग पाडले. राघोबांनी महेश्वर येथे येवून अहिल्याबाईंची भेट घेतली. झालेल्या चुकीबद्दल त्यांची क्षमा मागितली. क्षमा मागणाऱ्या राघोबांना अहिल्याबाईंनी मोठ्या मनाने माफ केले. परंतु होळकर आणि पेशवे वेगळे नाहीत. थोरले बाजीराव आणि सासरे मल्हारराव यांनी निर्माण केलेली ही दौलत आहे. तुम्हाला पेशवे म्हणून येण्यासाठी होळकरांचे दरवाजे नेहमीच खुले असतात. कुरापती दिवाण चंद्रचूड यांच्या कानभरणीला आपण बळी पडून मोठी चूक केली आहे, असे ठणकावले. निरुत्तर झालेल्या राघोबांना अहिल्याबाईंनी कर्जातून बाहेर येण्यासाठी आर्थिक मदत केली. दिवाण गंगोबा तात्या यांना कैदेत टाकले.

हैदराबाद राज्यात दुष्काळ पडल्याने तसेच निजामशाही आर्थिक संकटात सापडल्याने तेथील हातमागावर विणकाम करणारे लोक महेश्वर येथे राजाश्रयासाठी अहिल्याबाईंकडे गेले होते. अहिल्याबाईंनी या सर्वांना राजाश्रय देत कापड विणकाम करण्यासाठी सूत, चरखा आणि राहायला जागा उपलब्ध करून दिली. त्यातून महेश्वरमध्ये साडीची निर्मिती सुरू झाली. अहिल्याबाईंनी महेश्वरी साडीवर परिसरातील फुलांचा तसेच आदिवासी महिलांनी तयार केलेल्या चित्राचा वापर करून सुंदर अशा साड्या तयार करवून घेतल्या. ज्यातून नवीन बाजारपेठ व रोजगारनिर्मिती होवू शकली. साडी विणकामात महिलांना संधी दिल्याने हजारो महिलांच्या हाताला काम मिळाले.

इ.स. १७८७ मध्ये जेजुरीत खाटकांचा मोठा उपद्रव होत असल्याने अहिल्याबाईंनी खाटकाच्या नावे खालीलप्रमाणे ताकीदपत्र पाठवून त्यास तंबी दिली. तसेच अहिल्याबाई होळकर यांनी निपुत्रिक, विधवा झालेल्या महिलांना दत्तकपुत्र घेण्याचा कायदा करून तो तातडीने अमलात आणला. निपुत्रिकांची संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करण्याची परंपरा बंद करून समाजाला नवीन दृष्टी

देण्याचा प्रयत्न केला.

महेश्वर येथील दगडी घाट तयार करताना तेथील शिल्पकारांचा अपघाती मृत्यू झाला होता. त्या विधवेस सती न जावू देता तिला तिच्या पतीच्या जागेवर काम करण्याची परवानगी दिली. पुढे काही वर्षांनी घाट तयार झाल्यानंतर अहिल्याबाईंनी शिल्पकार विधवा महिलेच्या हातून या घाटाचे लोकार्पण केले. अहिल्याबाई म्हणत की, विधवा होणे हा शाप नसून तो सृष्टीचा निर्णय आहे. विधवांच्या संरक्षाची जबाबदारी कुणी घेत नसल्याने विधवेच्या आईवडिलांच्या मनात तसेच समाजाचे नेतृत्व करणाऱ्या लोकांच्या मनात एक चिंता असायची. या चिंतेचे समाधान म्हणजे मृत पतीसोबत सती जाणे. हा पर्याय समाजात रूढ झाला. डोळ्यादेखत जिवंत स्त्रिया चितेवर जाळताना पाहून समाजाच्या मनाला तीव्र वेदना होत होत्या. मात्र धर्माच्या परंपरेविरोधात बोलण्याची क्षमता नसल्याने सतीची परंपरा सुरू होती. अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर कुंभेरीच्या युद्धात पडल्यानंतर अहिल्याबाईदेखील समाजाच्या चालीरीतीनुसार सती जाण्यासाठी निघाल्या होत्या. दूरदृष्टी लाभलेले सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांनी त्यांना राज्याच्या कामासाठी सती जावू दिले नाही. धर्मासाठी समाज नसून समाजासाठी धर्म आहे. रक्त सांडून उभी केलेली दौलत तुम्हाला सांभाळायची आहे. न्याय, नीती, धर्म तुम्हाला करायचा आहे. लोकांना जगवणारा धर्म आपला आहे, अशा समजूतदार गोष्टी सांगितल्यानंतर अहिल्याबाईंनी स्वतः सती जाण्याचा निर्णय मागे घेतला. मात्र त्यांच्या सवती सती गेल्या.

**(लेखक होळकर राजघराण्याचे (इंदोर) अभ्यासक आहेत.)**

●

**माहिती पाठवण्याचे आवाहन**

**'महाराष्ट्र अंनिस खबरबात' सदरासाठी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शाखांनी उपक्रमांचे फोटो, मजकूर पाठवावेत.**
**संपर्क : अनिल करवीर : ९८२३२८०३२७**
karviranil@gmail.com

## ठरव आता डोळस व्हायचं

ठरव, आता आपण डोळस व्हायचं
अज्ञानाचं भूत डोक्यातून काढायचं
तर्क, चिकित्सा, प्रयोग साधन जवळ ठेवायचं
गंडे, दोरे, ताबीज आता कुठवर बांधायचं ?
ठरव, आता आपण डोळस व्हायचं...।।१।।

वर्तमानात जगायचं, भूतकाळ विसरायचं
चिकित्सा करीत भविष्य रंगवायचं
कर्तव्याची शिढी चढत प्रगती करायचं
जुन्या प्रथा, परंपरेत अडून कुठवर राहायचं ?
ठरव, आता आपण डोळस व्हायचं...।।२।।

पूर्वजांनी केला म्हणून आपण करायचं
नवस, मुंज, पितृपक्ष, ह्यात रमायचं
संकटाशी दोन हात करीत खंबीर राहायचं
दैव, नशिबाला दोष कुठवर द्यायचं ?
ठरव, आता आपण डोळस व्हायचं...।।३।।

आपणालाही असते काही सांगायचं
चुकते म्हणून आपण नाही बोलायचं ?
प्रश्नांची नेहमी उकल करायचं
घाबरत घाबरत आपण कुठवर जगायचं ?
ठरव, आता आपण डोळस व्हायचं...।।४।।

निसर्गाचं चक्र चालूच राहायचं
घटना करणामुळेच घडतात नाही विसरायचं
भूत, पिशाच्च समजून बुवाबाबाकडे जायचं
आपल्यातला विवेकवाद का विसरायचं ?
ठरव, आता आपण डोळस व्हायचं...।।५।।


**उपेंद्र रोहनकर**
गडचिरोली
मो. ९४०३२५२९४४

# स्वयंपूर्ण भारताचा पाया रचणारे नेहरू



**हरिभाऊ सोळंके** । माजलगाव
७२४८९४२३००

स्वातंत्र्य आंदोलनात स्वातंत्र्यसैनिक म्हणून सतत आघाडीवर राहून कष्ट आणि तुरुंगवास सोसलेल्या नेहरूंच्या वाट्याला स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान म्हणून उपाशी, भुकेलेला भारत देश आलेला होता. उपाशी, भुकेलेला देश समर्थपणे कसा उभा करता येईल यासाठी प्रयत्न करताना आता तर नेहरूंना उसंतच नव्हती. 'आराम हराम है' हे घोषवाक्य देणाऱ्या नेहरूंनी त्यानुसार कृतीची सुरुवात स्वतःपासूनच केली. संस्थानांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया एकीकडे सुरू होती, तर दुसरीकडे उपाशी देशासाठी अन्नधान्याची सोय अग्रक्रमाने करणे क्रमप्राप्त होते. स्वातंत्र्याच्या पाच वर्षे आधी बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळात ४० लाखांहून अधिक भूकबळी गेले होते. दुष्काळ हा देशाच्या पाचवीला पूजलेला होता. सामान्यपणे दर तीन वर्षांनी देशाच्या मोठ्या भूभागाला दुष्काळाला सामोरे जावे लागत असे म्हणून अन्नधान्याचे उत्पादन निर्मिती वाढविणे ही देशाच्या पंतप्रधानांची पहिली जबाबदारी होती. दारिद्र्य आणि भूकबळी याबाबत नेहरूंना प्रचंड चीड होती. देशापुढे अनेक समस्या असतानाच आधी अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने नेहरूंनी पावले उचलायला सुरुवात केली.



२९ जून १९४९ रोजी आकाशवाणीवरून राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात नेहरू म्हणाले, 'मला आज तुमच्याशी विशेषतः अन्नधान्याबद्दल बोलायचे आहे. अन्न ही माणसाची मूलभूत गरज आहे आणि हे अन्न आज आपली मूलभूत समस्या बनली आहे. सरकारला वारशाने मिळालेली अर्थव्यवस्था पूर्णपणे विकसित नाही, तसेच त्यात संतुलनही नाही. शेती आणि उद्योग या दोन्हीबाबतीत देश मागासलेला आहे. या लढ्याने (दुसऱ्या महायुद्धाने) परिस्थिती आणखीनच बिघडली. संकटाचे एक कारण हे होते की, पंजाबचा काही भाग आणि सिंध ही प्रमुख गहू उत्पादक राज्ये फाळणीनंतर पाकिस्तानला गेली.'

नेहरू पुढे म्हणतात, 'दुसरीकडे शेती आणि कारखान्यांचे उत्पन्न कमी आहे. एक गोष्ट निश्चित आहे की, कारखान्यांबद्दल किंवा शेतीबद्दल आपण कोणतेही धोरण स्वीकारले तरी अडचण एकच आहे, ती म्हणजे अधिक उत्पन्न अतिरिक्त भांडवलाशिवाय होणार नाही. अशा परिस्थितीत आपण ना पगार वाढवू शकतो, ना वेतन. मात्र उत्पादन वाढल्यावर ते काही मोजक्या लोकांच्या हातात राहू नये; ते लोकांमध्ये प्रामाणिकपणे वाटून घ्यावे लागेल, हे लक्षात घेतले पाहिजे. देशाच्या विकासाची तयारी आपण करीत आहोत. गरज पडली तर आपण अनेक चैनीच्या वस्तू सोडून गरजेच्याच वस्तू ठेवू शकतो. पण अन्नाशिवाय कोणीही राहू शकत नाही.' नेहरूंच्याबाबतीत एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, नेहरूंना जसे आंतरराष्ट्रीय राजकारण समजत होते तसेच देशातील शेती व उद्योगांचे अर्थशास्त्रसुद्धा समजत होते. म्हणून सार्वजनिक उद्योगांच्या उभारणीबरोबरच भारत अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण व्हावा यासाठी नेहरू धडपडत होते. प्रत्येक भाषणामध्ये अन्नधान्याची नासडी टाळणे व भुकेलेल्याला अन्न याची काळजी ते व्यक्त करीत. १५ ऑगस्ट १९४९ रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करताना नेहरूंनी मोठ्या मेजवान्या थांबवण्याचे आव्हान जनतेला केले होते. त्यानंतर एक वर्षांनी १५ ऑगस्ट १९५० रोजी लाल किल्ल्यावरून नेहरूंनी स्पष्ट केले, अन्नधान्याचे संकट देशाच्या वास्तविक स्वातंत्र्याला धोका आहे. प्रत्येक भारतीयाचा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अन्नाचा प्रश्न आणि त्यासाठी गेली तीन वर्षे आपण खूप प्रयत्न केले आहेत. तरीही मद्रास आणि बिहार प्रांतात अन्नधान्याबाबत विदारक परिस्थिती आहे. तिथून विचित्र बातम्या ऐकायला मिळतात, त्या वाचल्या की मन हेलावून जाते.

दारिद्र्याबाबत नेहरूंना खूप चीड होती. ती चीड नुसत्या भाषणातूनच व्यक्त करून न थांबता अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याच्या धोरणांची नेहरू प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत होते.

ऑक्टोबर १९४८ मध्ये नेहरू लंडनला गेल्यानंतर त्यांनी हेन्री फर्ग्युसन यांची भेट घेतली. हेन्री फर्ग्युसन हे ऑटोमोबाईल जगतातील त्याकाळी प्रसिद्ध नाव होते.



आजही त्यांना आधुनिक ट्रॅक्टरचे जनक मानले जाते. मात्र नेहरूंना भारतातील भुकेलेल्यांसाठी अन्ननिर्मिती करायची होती व अन्ननिर्मिती वाढविण्यासाठी महत्त्वाचे यंत्र म्हणजे ट्रॅक्टर होते. नेहरूंनी देशाच्या पैशातून स्वतःसाठी विमान नाही, देशासाठी ट्रॅक्टर्स खरेदी करण्याचे ठरविले. त्यांनी ३०-४० ट्रॅक्टर्स भारतात चाचणीसाठी पाठवण्याची व्यवस्था केली. २७ ऑक्टोबर १९४८ रोजी अन्नमंत्री जयरामदास दौलत यांना पाठवलेल्या तारेत नेहरू म्हणतात, 'फर्ग्युसन ट्रॅक्टरबद्दल मला अधिक माहिती मिळाली आहे. मला खात्री आहे की, भारतासाठी तो सर्वोत्तम ट्रॅक्टर आहे.' भारतात परतल्यानंतर १९ नोव्हेंबर १९४८ रोजी नेहरूंनी पुन्हा जयरामदास दौलतराम यांना पत्र पाठवले. त्यात ते लिहितात, 'काल माझ्या श्रीनगर भेटीदरम्यान सांगण्यात आले की, जर काश्मीरला काही ट्रॅक्टर मिळाले तर खोऱ्यात अन्नधान्य उत्पादन खूप लवकर वाढवता येईल. माझेही असे मत आहे की, शक्य असल्यास हिवाळ्यापूर्वी किमान दोन किंवा अधिक ट्रॅक्टर तिथे पाठवावेत ज्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात मोठी वाढ होईल.' नेहरू इथेच थांबले नाहीत तर शेख अब्दुल्ला यांच्याशी बोलून ट्रॅक्टर दुरुस्तीसाठी त्यांच्याकडे आवश्यक कर्मचारी आहेत का, अशीही विचारणा केली. एवढी बारीकसारीक काळजी घेणारे नेहरू होते. पुढे नेहरूंनी 'हिंदुस्तान मशीन टूल्स' (HMT) या नावाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग सुरू करून 'एचएमटी ब्रँड'चा स्वदेशी ट्रॅक्टरसुद्धा बनवला जो लाखो शेतकऱ्यांच्या पसंतीला उतरला. एचएमटी या सार्वजनिक उद्योगाने दैनंदिन वापराच्या यंत्रांच्या आणि उपकरणांच्या शेकडो स्वदेशी उत्पादनांची निर्मिती केली. काही दशकांपूर्वी स्वदेशी बनावटीचे एचएमटीचे घड्याळ मनगटावर असणे ही एक प्रतिष्ठेची बाब होती; कारण ती निर्यातसुद्धा व्हायची, इतक्या उत्कृष्ट दर्जाची होती.

अन्नधान्याचे उत्पादन वाढवण्यासाठी यांत्रिक साधनांची जशी आवश्यकता होती तशीच शेतीसाठी पाण्याची गरज होती, अधिक उत्पन्न देणाऱ्या सुधारित बियाण्यांची गरज होती. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीतून फारसे उत्पादन होत नसे. दर तीन वर्षांनी देशाला दुष्काळाचा सामना करावा लागत असे. नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ याबाबत नेहरूंची जागरुकता आणि त्यांना देशवासियांबद्दल किती तळमळ होती हे त्यांनी १५ ऑगस्ट १९५२ रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात दिसून येते. त्यात ते म्हणतात, गेल्या काही वर्षांच्या तुलनेत आमच्या शेतीची स्थिती बरी झाली आहे. पाऊसही चांगला पडलेला आहे, बहुतेक अन्नधान्याचे उत्पादन चांगले झाले आहे. स्वातंत्र्यानंतर जो भारत अन्नधान्याबाबत दुसऱ्या देशावर अवलंबून राहात होता तो नेहरूंच्या प्रयत्नांमुळे १९५२ पर्यंत स्वयंपूर्ण होण्यास सुरुवात झाली होती. उत्पादन वाढीसाठी सिंचन, विद्युत, शेती उत्पादनासाठी लागणारे चांगले बियाणे याचबरोबर देशात सर्वांना शिक्षण व विज्ञान-तंत्रज्ञानातून भविष्यातील भारताच्या औद्योगिक प्रगतीचा पाया नेहरूंना रचायचा होता.

असा पाया रचण्यासाठी शिस्तबद्ध नियोजनाची गरज होती. म्हणून नेहरूंनी मार्च १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना केली. नेहरू स्वतः या आयोगाचे अध्यक्ष झाले. वास्तविक पाहाता, देशासाठी नियोजन आयोगाचा आराखडा १९२७ पासून नेहरूंच्या मनात घोळत होता. जेव्हा नेहरूंनी सोव्हिएत रशियाला पहिली भेट दिली, तेव्हापासून नेहरूंना भारतासाठी नियोजन आयोगाची गरज वाटली होती. पहिली पंचवार्षिक योजना तयार करण्यासाठी पंधरा महिन्यांत या नियोजन आयोगाने देशाची एकूण आर्थिक परिस्थिती, देशाच्या क्षमता आणि गरजा यांचा अभ्यास केला. प्रत्येक क्षेत्राचा पाया

रचण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील नियोजन आयोगाची स्थापना केली व त्या माध्यमातून पंचवार्षिक योजना राबवण्यास सुरुवात केली. एका गतिमान राष्ट्राच्या उभारणीसाठी नेहरूंनी हा पाया घालण्यास सुरुवात केली होती. प्रत्येकाला रोजगार देता येईल, अशा स्वावलंबी राष्ट्राचे स्वप्न नेहरू पाहात होते. आपले सरकार देशासाठी नेमके काय करीत आहे याबाबत देशावासियांशी संवाद करण्याची कला नेहरूंना अवगत होती. नियोजन आयोगामार्फत देशाच्या पंचवार्षिक योजनेचा फायदा देशासाठी कसा होतो आहे ते नेहरूंनी ३१ डिसेंबर, १९५२ रोजी ऑल इंडिया रेडिओवरून प्रसारित केलेल्या भाषणातून स्पष्ट होते. ते भाषण मुळातूनच वाचण्यासारखे आहे. भाषणात नेहरूंनी म्हटले, 'आपली अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचना आता शिळी झालेली आहे. गरज आहे ती या सर्व गोष्टींच्या पुनर्मांडणीची; ज्यामुळे आपल्या लोकांचे भौतिक कल्याण होईल. नियोजनाचा अर्थ असा की, उपलब्ध संसाधनांचा हुशारीने वापर करणे. देशातील मोठ्या प्रमाणात उपलब्ध मनुष्यबळाचा राष्ट्राच्या उभारणीत सहभाग करून घेणे. काही मिनिटातच या नियोजनाबद्दल मी जास्त सांगू शकत नाही. पण या नियोजनामुळे समाजसेवा करण्याची इच्छा असलेल्या लोकांना जास्तीत जास्त काम करण्याची संधी मिळेल. यामध्ये सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या दोघांची भूमिका आहे. शेती हाच आपला सर्वात मोठा रोजगार देणारा उद्योग आहे. त्यामुळे कृषी आयोगावरच सर्वाधिक भर देण्यात आलेला आहे. शेती समृद्ध झाली तर आपण औद्योगिक प्रगती करू शकतो, हे जाणून घ्या. देशाच्या मोठ्या अर्थव्यवस्थेची शेतीशी सांगड घालावी लागेल. शेतीचा विकास व राष्ट्राची प्रगती साध्य करायची असेल तर जमीनदारी, जहागीरदारी प्रथा रद्द करून, शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा निश्चित करावी लागेल. गरिबीशी लढायचे असेल आणि जीवनमान उंचवायचे असेल तर शेती आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रात उत्पन्न वाढले पाहिजे. स्वावलंबी भारतासाठी ग्रामीण व कुटीर उद्योगांना स्वावलंबी बनवत अधिकाधिक रोजगाराचे उद्दिष्ट आपल्याला गाठायचं आहे.'

नेहरूंनी या संवादात इतरही अनेक बाबींचा परामर्श घेतला. आपल्याला इतर देशापुढे हात पसरावे लागू नयेत यासाठी नेहरूंचे सर्वात महत्त्वाचे ध्येय म्हणजे अन्नधान्याच्या बाबतीत भारताची स्वयंपूर्णता हे होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या उत्पादनाचे उद्दिष्ट आठ दशलक्ष टन ठेवण्यात आले. यासाठी आठ दक्षलक्ष एकर जमिनीच्या सिंचनासाठी मोठे पाटबंधारे प्रकल्प आणि तीन दशलक्ष एकर जमिनीच्या सिंचनासाठी लघु पाटबंधारे प्रकल्पांची आखणी झाली. केवळ डिझेल नव्हे तर वीज हीच उद्योगांची मूलभूत गरज म्हणून त्यांनी ओळखली. आणि या मोठ्या प्रकल्पांमुळे सिंचनाव्यतिरिक्त निर्माण होणारी लाखो किलोवॅट वीज खरोखरच उद्योगांसाठी खूपच उपयुक्त ठरली. नेहरूंनी लघु पाटबंधारे प्रकल्पांना खूप महत्त्व दिले; कारण ते लवकर पूर्ण होतात. यावरून त्याकाळी देशापुढील समस्यांवरील उपाय शोधताना नेहरूंनी किती काळजीपूर्वक अभ्यास केला होता ते लक्षात येते.

कापूस उत्पादन १२ लक्ष गाठींवरून २० लक्ष गाठी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. हातमाग उत्पादन ८ दशलक्ष यार्डावरून १७ दशलक्ष यार्ड वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. सिंद्री येथे कृत्रिम खताचा मोठा कारखाना सुरू केला. स्टील आणि सिमेंटच्या उत्पादनात मोठी वाढ केली. जड इलेक्ट्रिकल उपकरणे तयार करण्यासाठी 'भारत हेवी इलेक्ट्रिकल्स' हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग सुरू केला. हवाई वाहतुकीचे राष्ट्रीयकरण केले. आधुनिक बांधकाम उद्योगांना चालना दिली. आधुनिक भारतासाठी लहान आणि मोठे उद्योग समृद्ध होणे आवश्यक होते; कारण औद्योगिक विकासाशिवाय लोकांचे जीवनमान उंचवता येत नाही. तात्पर्य, नेहरूंनी आधुनिक भारताच्या प्रगतीचा पाया अतिशय डोळसपणे, जागरूक राहून रचला होता. त्यासाठी नेहरूंनी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. म्हणजे जल, जंगल, जमीन अशी नैसर्गिक संसाधने देशाच्या मालकीचीच ठेवली आणि त्यावर आधारित उद्योगांच्या उभारणीसाठी खाजगी क्षेत्राला चालना दिली. अशी लोकशाही समाजवादी रचना नेहरूंनी अंमलात आणली.

नेहरूंनी ३ डिसेंबर, १९५३ रोजी पहिली पंचवार्षिक योजना पुढे आणली होती. कमला सागर हे धरण नोव्हेंबर १९५२ च्या नियोजन आराखड्यानुसार बांधण्यात आले होते. सिंचन प्रकल्प नेहरू जातीने लक्ष देत स्वतःच हाताळत. भाक्रा नांगल हा प्रकल्प नेहरूंसाठी सर्वात महत्त्वाचा होता. तत्कालीन राजकीय विरोधकांनी अनेक प्रकारे वाद करून विरोध केला, तरीही नेहरूंनी तो पूर्ण करायचा निश्चय केला होता. हा प्रकल्प केवळ पूर्व पंजाब

आणि पाकिस्तानमधून आलेल्या विस्थापित लोकांचे नशीब बदलणारा नव्हता, तर संपूर्ण देशाचे नशीब बदलणार होता; याची नेहरूंना खात्री होती. या पार्श्वभूमीवर ३ जानेवारी १९४८ रोजी नेहरूंनी सार्वजनिक बांधकाममंत्री नरहर विष्णू गाडगीळ यांना भाक्रा नांगल धरणाच्या संदर्भात पत्र लिहिले. त्यामध्ये लिहितात, 'भाक्रा धरणाबद्दल मी तुम्हाला यापूर्वी पत्र लिहिले होते. ही योजना अतिशय महत्त्वाची आहे. ही योजना पूर्व पंजाबमधील पुनर्वसनाशी संबंधित आहे. त्यामुळे हा प्रकल्प वेगाने राबवण्याची गरज आहे. पंजाब सरकारच्या मर्यादित साधनांवर हा प्रकल्प न सोडता, या प्रकल्पाला केंद्र शासनाकडून वित्तपुरवठा होत असल्यामुळे निर्णय केंद्र सरकार घेईल. धरणाचे कंत्राट अमेरिकेतील एका मोठ्या कंपनीला द्यायला हवे.' जगातील सर्वोत्तम बांधकाम कंपन्यांचे मार्गदर्शन, सल्लामसलत या प्रकल्पासाठी घेण्यात आली होती. अभियंता व्ही. एल. सावज यांच्या नेतृत्वाखाली अभियंत्यांची एक मोठी टीम धरणाच्या कामाला लागली होती. अभियंत्यांना कामाची कालमर्यादा ठरवून देण्यात आली होती. दर पंधरवड्याला अहवाल तयार करून धरणाच्या कामाची प्रगती किती झाली याचा आढावा नेहरू स्वतः घेत असत. नेहरूंनी पंतप्रधान म्हणून राष्ट्राच्या उभारणीसाठी भाक्रा नांगल धरणाच्या कामात स्वतःला किती झोकून दिले होते, हे यावरून लक्षात येते. नेहरूंच्या याच समर्पित भावनेमुळे देशातील एकेक धरण प्रकल्प आकाराला येऊ लागले.

१९४९ साली नेहरूंनी अमेरिकेला भेट दिली. अमेरिकेच्या पहिल्या दौऱ्यात 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'ला नेहरूंनी आवर्जून भेट दिली होती. अशा प्रकारची तंत्रज्ञान विद्यापीठे भारतात स्थापन व्हावीत, अशी इच्छा नेहरूंच्या मनात होती. म्हणून नेहरूंनी विज्ञानाशी संबंधित संस्थांची पायाभरणी केली. भारतीय तंत्रज्ञान संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंडियन सायंटिफिक रिसर्च ऑर्गनायझेशन, भाभा अनुसंशोधन केंद्र आणि ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स). आज कोणताही राजकारणी आजारी पडला की, त्याला एम्समध्येच उपचार हवा असतो. या सर्व संस्था नेहरूंनी उभ्या केल्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या १५ वर्षांत नेहरूंनी त्यांच्या संकल्पातील विज्ञान-तंत्रज्ञान संस्थांची उभारणी करून दाखवली, म्हणून देशाची प्रगती आज दिसत आहे. त्याचे सर्व श्रेय पंडित जवाहरलाल नेहरू यांनाच जाते.

२१ एप्रिल १९५६ रोजी खरगपूर येथील 'आयआयटी'तील अभियंत्यांची पहिली तुकडी बाहेर पडली. त्या दीडशे अभियंत्यांच्या दीक्षांत समारंभात नेहरूंनी त्यांना देशातील समस्यांची जाणीव करून देणारे प्रेरणादायक भाषण करीत निर्णायक हजेरी लावली. नेहरूंच्या प्रेरणेने सर सी. व्ही. रमण, डॉ. होमी भाभा, मेघनाद सहा, विक्रम साराभाई, सतीश धवन, शांतीस्वरूप भटनागर असे नामवंत शास्त्रज्ञ राष्ट्रीय संशोधन कार्यात काम करू लागले. भारतातल्या वैज्ञानिकांबरोबरच परदेशातील काही वैज्ञानिक भारतात यावे असे नेहरूंचे प्रयत्न असत. ओपनहायमर (Julius Ropert Oppenheimer) हे जगप्रसिद्ध वैज्ञानिक अणुबॉम्ब निर्मितीच्या संशोधकांपैकी एक होते. नेहरूंनी ओपनहायमर यांना भारतात येण्याचे निमंत्रण दिले. त्यांना अणुशक्तीचा शांततेसाठी कसा उपयोग करून घेता येईल यावरील संशोधनासाठी सर्व सोयी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन नेहरूंनी त्यांना दिले. बी.एस.हॉल्डेन (John Burdon Sanderson Haldane) या जागतिक कीर्तीच्या प्राणिशास्त्रज्ञास भारतात आणण्यात नेहरू यशस्वी झाले. लंडन विद्यापीठाचे रासायनिक अभियांत्रिकी विषयाचे प्राध्यापक प्रा. टी. एम. नेविट यांनी १९६४ मध्ये नेहरूंबद्दल लिहिले होते, 'विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या महत्त्वाचे आकलन असलेले नेहरू आधुनिक राष्ट्रांतील एकमेव पंतप्रधान असावेत.' नेहरूंनी विविध क्षेत्रातील संशोधन करणाऱ्या ४५ संशोधन संस्था उभ्या केल्या.

विक्रम साराभाई यांच्या सूचनेनुसार २३ फेब्रुवारी १९६२ साली थुंबा येथे Indian National Committee for Space Research (INCOSPAR) हे रॉकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले होते. त्यावेळी हे केंद्र अणुशक्ती विभागाकडे होते. १९६३ मध्येच भारताचे पहिले रॉकेट आकाशाकडे झेपावले होते. आज भारताची मंगळावर यान पाठविण्यापर्यंत प्रगती झाली तिचा पाया पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घातलेला आहे. ही सर्व वाटचाल तरुणांनी समजून घेतली पाहिजे.

**(लेखक सामाजिक कार्यकर्ता व नेहरुनीतीचे अभ्यासक आहेत.)**

●



# स्मशानभूमीतील अघोरी प्रकार

**संजय बनसोडे** । इस्लामपूर
९८५०८९९७१३

चिकुर्डे (ता.वाळवा, जि.सांगली) येथील स्मशानभूमीत होळी उत्सवानंतर घडलेल्या जादूटोण्याच्या अघोरी प्रकाराने भीतीचे वातावरण पसरले होते. याबाबत गावचे पोलीस पाटील मा. सुधीर कांबळे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या इस्लामपूर शाखेशी संपर्क साधला व भीती दूर करण्याची विनंती केली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, इस्लामपूर शाखेचे कार्याध्यक्ष प्रा. बी. आर. जाधव, निवृत्त प्राचार्य डॉ. सुदाम माने, अजय भालकर, विनोद मोहिते आदींनी तत्काळ स्मशानभूमीला भेट दिली व वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न केला.



चिकुर्डे गावातील स्मशानभूमीत ज्या ठिकाणी प्रेत जाळले जाते त्या लोखंडी कठड्याला काळ्या कपड्यामध्ये काही वस्तू गुंडाळून ठेवलेली पाच गाठोडी आढळून आली. कापड काढल्यानंतर त्यात नारळावर कागदी चिठ्ठ्या लाल रंगाच्या दोऱ्याने बांधलेल्या होत्या. सोबतच काळ्या बाहुल्यावर मुलींचे फोटो दाभणाने खुपसून ठेवलेले आढळून आले. हे कमी होतं म्हणून की काय सोबत लिंबूसुद्धा ठेवलेले होते. चिठ्ठ्या उघडून पाहिल्यानंतर त्यावर मुलींची नावं लिहिलेली होती. एका कागदावर एका मुलाचे नावदेखील लिहिलेले होते.

एखाद्या मांत्रिकाच्या मदतीने कोणीतरी हा अघोरी प्रकार केलेला असण्याची शक्यता होती. होळी पौर्णिमेपासून रस्त्याच्या लगत असणाऱ्या स्मशानभूमीत हा प्रकार सुरू होता. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीत धाव घेत हा प्रकार उघडकीस आणला. तसेच उपस्थित नागरिकांचे प्रबोधन केले व स्मशानभूमीची स्वच्छतादेखील केली. ग्रामस्थांनी या प्रकाराबाबत घाबरून जाण्याची गरज नाही, असेही आवाहन केले. कुरळप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सरनोबत यांनी या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन मुळापर्यंत तपास करून कोणत्याही मुलीची ओळख जाहीर न करता दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन दिले. पोलीस मांत्रिकाचा शोध घेत आहेत. वाळवा तालुक्यातील चिकुर्डेसारख्या सधन गावातील रस्त्यालगत असणाऱ्या स्मशानभूमीत हा प्रकार घडल्याने गावात दहशत निर्माण झाली होती. एक प्रेत दहन करण्यासाठी स्मशानभूमीत आणल्यानंतर काळ्या कपड्यात लटकलेली गाठोडी पाहून संबंधितांनी प्रेत तिथून हलवत स्वत:च्या शेतात त्याचे दहन केले. महा.अंनिसच्या कार्यकर्त्यांनी हा प्रकार उघडकीस आणेपर्यंत तेथे प्रेत दहन करण्यास कोणीही आलेले नव्हते. समाजावर करणी, भूत, भानामती, अघोरी विद्या आदींचा प्रभाव असल्यामुळे अशा प्रकारच्या घटनांची चिकित्सा करण्याचे धाडस उच्चविद्याविभूषितसुद्धा करत नाहीत. शेवटी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीलाच त्यांचं वास्तव समाजासमोर आणावं लागतं.

या प्रकरणी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन कायदा २०१३ नुसार हे कृत्य करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, घटनेच्या मुळापर्यंत पोलिसांनी जावे. या कृत्यामागील सूत्रधारांचा शोध पोलिसांनी घ्यावा व कायदेशीर कारवाई करावी, अशी अर्जाद्वारे मागणी महा. अंनिसच्या वतीने करण्यात आलेली आहे.

**(लेखक महा.अंनिसचे राज्य प्रधान सचिव आहेत.)**



# शासनाचा पुरस्कार समाज कल्याणाला की अंधश्रद्धा प्रसाराला?

**दिगंबर कट्यारे** । जळगाव
९८६०३११३२२

महाराष्ट्र अंनिसचा 'विज्ञान बोधवाहिनी'चा 'फिरते नभांगण' हा कार्यक्रम अमळनेर परिसरातील पातोंडा या गावातील एका निवासी आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना सहज प्रश्न विचारला, 'मंगळ ग्रह कोठे आहे?' तर बहुतेक सर्व विद्यार्थ्यांनी उत्तर दिले, 'मंगळ ग्रह अमळनेर येथे आहे'. मी म्हटलं, 'अरे, ते तर मंगळ ग्रहाचे प्रतीक म्हणून मानवाने निर्माण केलेले मंदिर आहे. बाळांनो, मंगळ ग्रह अमळनेर येथे नाही, तो अवकाशात पृथ्वीप्रमाणेच सूर्याभोवती फिरणारा एक ग्रह आहे.' मुलांच्या मनामध्ये मंगळ ग्रह म्हणजे अमळनेर येथील मंगळ ग्रहाचे मंदिरच असा समज का निर्माण झाला असावा; याचा मी विचार करू लागलो आणि त्याविषयी वेध घेण्याचे ठरवले.

या पृथ्वीतलावरील कोणतीही मूर्ती असो, शिल्प असो, ते कोणत्या तरी मानवानेच घडविलेले असते. परंतु मंगळग्रहाची मूर्ती पुरातन काळातील असून स्वयंभू आहे, असा अविश्वसनीय बोलबाला केला गेला आहे. १९३३ साली या मंदिराचा पहिला जीर्णोद्धार झाला. परंतु स्वातंत्र्यलढ्याची धामधूम म्हणा किंवा इतर कोणत्या कारणाने म्हणा १९४० नंतर हे मंदिर पुन्हा लोकनजरेतून दुर्लक्षित झाले आणि त्या जागेचा कचरा डेपोसारखा वापर होऊ लागला. समाजकंटक आणि व्यसनाधीनांसाठी तर ही जागा जुगार खेळण्यासाठी, नशा करण्यासाठी अनेक दशके अड्डाच बनली होती. स्वातंत्र्यानंतर विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती होऊ लागली तसे शहर वाढू लागले; मंदिरे ही राजकारणाची आश्रयस्थाने होऊ लागली आणि तशातच काही हितसंबंधीयांचे या मंदिराकडे लक्ष गेले. त्यांनी मंदिरासाठी 'मंगळग्रह सेवा संस्था' या नावाने विश्वस्त मंडळाची स्थापना करून १९९९ साली दुसऱ्यांदा जीर्णोद्धार करून त्या जागेचा कायापालट केला. विश्वस्त मंडळाच्या जाहिरात कौशल्यामुळे तसेच फलज्योतिषाच्या जनतेतील वाढत्या भयकारी प्रभावामुळे हे मंदिर तीर्थस्थळ तथा जीवनातील समस्यांवरील तोडगा व कर्मकांडांचे केंद्र तसेच पर्यटनस्थळ म्हणून देखील नावारूपास यायला सुरुवात झाली. याच जाहिरातबाजीचा भाग म्हणून २००५ साली मंदिर व्यवस्थापनाने मंदिराच्या कामकाज प्रणालीसाठी ISO प्रमाणपत्रसुद्धा प्राप्त केले.

अलीकडेच महाराष्ट्र शासनाकडून समाजकल्याण क्षेत्रातील कामासाठी या 'मंगळग्रह सेवा संस्थे'ला १२ मार्च २०२४ रोजी सन २०२२-२३ चा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले आहे. त्याअगोदर याच संस्थेला २०२१ या वर्षी 'पर्यटन मित्र' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

या संस्थेला 'पर्यटन मित्र' पुरस्कार दिला गेला तेव्हा मी या संस्थेच्या मंदिराला भेट द्यायचे ठरवले. मी रिक्षातून या मंदिराकडे जात असताना 'मंगळ ग्रहाचे दुष्परिणाम माझ्या मुलीच्या आयुष्यात अनुभवाला येत आहेत', असे शेजारी बसलेल्या मंगळ ग्रह मंदिराकडेच निघालेल्या ताई सांगत होत्या. रिक्षाचालकाने देखील मंगळ ग्रह 'खतरनाक' असल्याचा दुजोरा दिला. मी त्यांना समजावून सांगू लागलो, 'मंगळ ग्रह पृथ्वीसारखाच एक ग्रह असून पृथ्वीपासून साडेसात कोटी किलोमीटर अंतरावर आहे. तो परप्रकाशी आहे. तेथून कोणतीही किरणे येत नाहीत. त्या ग्रहाचा मानवी जीवनावर काडीचाही परिणाम होत असल्याची कोणतीही शास्त्रीय तथ्ये आढळून आलेली नाहीत.' यावर मात्र रिक्षावाला किंवा त्या ताईने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. परंतु ताईसोबत असलेल्या छोट्या शालेय मुलीने 'हे बाबा अगदी बरोबर सांगत आहेत', असे ठणकावून सांगितले. या शालेय विद्यार्थिनीने ग्रहताऱ्यांचा योग्य अभ्यास केल्याने तिला मंगळ ग्रहाविषयीच्या वैज्ञानिक माहितीचे चांगले आकलन झालेले होते. परंतु समाजातील असे तुरळक अपवाद वगळता मोठ्यांच्या मनातील मंगळ ग्रहाविषयीची भीती व पगडा इतर मुलांच्या मनात संक्रमित होत असावा

काय? या प्रश्नाने माझ्या मनात विचारांचे चक्र सुरू झाले. ग्रहांच्या विविध स्थितींचे परिणाम मानवी जीवनातील घडामोडींवर होतात, हेच हास्यास्पद असून, अवैज्ञानिक आहे. ही बाब शालेय विज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमाशी विसंगत आहे.

फलज्योतिषात ग्रहांच्या गतींचा आणि स्थितींचा मानवी जीवनातील घडामोडींशी संबंध जोडला जातो; ज्यात कोणताही कार्यकारणभाव सिद्ध झालेला नाही. आपल्या सूर्यमालेत फक्त सूर्य हाच एक स्वयंप्रकाशित तारा आहे. त्यामुळे त्यापासून अनेक प्रकारची किरणे आणि विद्युतचुंबकीय लहरी निघून त्या पृथ्वीपर्यंत पोहोचतात. त्यांचा परिणाम पृथ्वीवरील वातावरणावर होतो. व्यक्तीच्या भौतिक जीवनावरदेखील त्याचा परिणाम होतो. परंतु एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या जीवनात विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट प्रसंगी विशिष्ट परिणाम होत असल्याचे काहीही सिद्ध झालेले नाही. सूर्यमालेतील इतर ग्रह तर परप्रकाशित असून कोणत्याही ग्रहातून कोणतीही किरणे अथवा लहरी बाहेर पडत नाहीत. शिवाय व्यक्तीच्या जन्माच्यावेळी या ग्रहांची जी काही एकमेव स्थिती असेल ती त्या व्यक्तीच्या जन्मकुंडलीत दाखवून संपूर्ण आयुष्यातील प्रसंगांवर ती परिणाम करत राहील यास कोणताही वैज्ञानिक आधार नाही. ज्या ग्रहावर माणसाचा जन्म होतो, ज्याच्या वातावरणात तो राहातो, त्या पृथ्वी ग्रहाचाच सर्वाधिक प्रभाव माणसावर होतो; परंतु नेमके त्या पृथ्वी ग्रहालाच या जन्मकुंडलीत कुठलेही स्थान नाही. कोणताही वैज्ञानिक सिद्धांत निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचिती आणि प्रयोग या पायऱ्यांनी सिद्ध होत असतो. फलज्योतिषातील कोणताही सिद्धांत अशा क्रमाने सिद्ध झालेला नाही. त्यामुळे फलज्योतिष हे कोणतेही शास्त्र नसून ते एक थोतांड आहे असे जगभरातील अनेक नामवंत शास्त्रज्ञांनी ठामपणे मांडलेले आहे.

फलज्योतिष हे जन्मवेळीच्या ग्रहस्थितीचा व्यक्तीच्या जीवनातील घटना आणि घडामोडींशी जोडलेला केवळ बादरायण संबंध आहे. माणसाला अज्ञात असलेल्या आपल्या जीवनाविषयी जे कुतूहल, असुरक्षितता, एक अनामिक भीती वाटते त्या कुतुहलाचा, असुरक्षिततेचा आणि भीतीचा समाजातील भोंदू लोकांनी स्वार्थासाठी केलेला हा काळाबाजार आहे. मग त्यात अमुक ग्रह अधिक दोषयुक्त, अमुक ग्रह लाभकारी असे कल्पनेने सोयीनुसार गुणधर्म चिकटवले गेले. त्यात कोणत्या तरी एक-दोन ग्रहांना काहीतरी विशेष दोष चिकटवत त्यांना धारेवर धरावे लागणार होते, तर त्यासाठी फलज्योतिषांना सापडले शनी आणि मंगळ. शनीला फक्त साडेसातीपुरता बदनाम केला तर मंगळाला कायमचा. या ग्रहांना केवळ दोष देऊन हे लोक थांबले नाहीत, तर त्या काल्पनिक दोषांच्या निवारणासाठी त्यांची पूजाअर्चा करण्याचे कर्मकांडदेखील यांनी समाजात पसरवले आणि त्यातूनच त्यांची मंदिरे उभारली गेली.

जन्मकुंडलीत प्रथम, चतुर्थ, सप्तम, अष्टम, द्वादश यापैकी कोणत्याही स्थानात मंगळ ग्रह आला तर 'कडक मंगळ', असा शेरा फलज्योतिषात मारलेला आहे. व्यक्तीच्या आयुष्यात अनंत अडचणी निर्माण करणारा आणि प्रगतीला मारक ठरणारा हा दोष फलज्योतिषाचा की मंगळाचा? कुंडलीतील एकूण बारा घरांपैकी वरील पाच घरांमध्ये मंगळ येण्याची शक्यता ४० टक्के आहे. याचा सरळ अर्थ म्हणजे लोकसंख्येतील ४० टक्के लोकांना फलज्योतिषाने आपल्या तावडीत ओढले आहे. तसेच मंगळ केवळ त्या घरात आला म्हणून तो ग्रह त्या व्यक्तीमध्ये काही दोष निर्माण करतो यासाठी पुरावा कोणता? फलज्योतिषाचे हे सिद्धांत कोणत्या वैज्ञानिक कसोट्यांतून सिद्ध झालेले आहेत? चिकित्सकपणे विचार केला तर मंगळाने तीच घरे का निवडली, याला काही आधार? अर्थात, ही घरे मंगळ ग्रहाने स्वतः निवडलेली नसून ती फलज्योतिषाचीच चालबाजी आहे. कोणताही निर्जीव ग्रह व्यक्तीच्या आयुष्यात दोष निर्माण करू शकतो का? आपल्या मर्जीनुसार ग्रहांना वापरणं ही शक्कल कोणाची? आर्थिक लाभासाठी अतार्किक आकडेमोड सांगितली की, सर्वसामान्य माणूस गोंधळात पडतो. तो यातील चालबाजी जाणून घेण्याच्या भानगडीत पडत नाही. त्याला बिचाऱ्याला फक्त या भीतिदायक परिस्थितीतून बाहेर निघण्याशी मतलब. मंगळ ग्रह हा पापग्रह, अनिष्ट असला की नुकसानकारक, इष्ट असला की राजवैभवासारखे अधिकार देणारा; या गोष्टींची चिकित्सा करण्याची त्याला गरज भासत नाही. मुळात

निर्जीव ग्रहांना भावना अथवा विचार नाहीत हे आजही एकविसाव्या शतकात सांगावे लागते, ही बाबच मुळात खेदजनक आहे.

असुरक्षितता व भीतीचे मार्केट हे फलज्योतिषाने निर्माण केलेले आहेच. परंतु मंगळ ग्रहाविषयी जनतेच्या मनात जास्तच भीती निर्माण होण्यासाठी अमळनेर येथील हे मंदिर कारणीभूत ठरत आहे. लोकांमध्ये या ग्रहाविषयी अशुभतेचे अधिकतम भय निर्माण करण्यात आलेले आहे. एखाद्याच्या कुंडलीत मंगळ ग्रह अनिष्ट घरात असेल तर त्या व्यक्तीला मंगळ ग्रहाची दशा भोगावी लागते, असे फलज्योतिषी सांगतात. लग्नाळूंना जर कडक मंगळ असेल तर पुरोहित वर्ग काही मार्ग सुचवतात. त्यात पुरोहित वर्गाचा आर्थिक फायदा दडलेला असतो. मंगळदोष असेल तर त्या ग्रहाची शांती केली की दोष नाहीसा होतो. पुरोहितांनी अमुक लग्नाळूसाठी आपली शांती केलेली आहे आणि आपण आता शांत राहावे, आता आपला अनिष्ट प्रभाव संबंधित व्यक्तीवर टाकू नये; असे पृथ्वीपासून साडेसात कोटी किलोमीटर अंतरावर असलेल्या निर्जीव मंगळाला कसे कळत असेल? त्यातही, कडक मंगळ असलेला मुलगा मंगळ ग्रहाची शांती केल्यावर मंगळ नसलेल्या मुलीशी लग्न करू शकतो; पण कडक मंगळ असलेल्या मुलींना मात्र फलज्योतिषाने ही मुभा दिलेली नाही. तिला फक्त मंगळ ग्रह असलेला मुलगाच हवा. अन्यथा, विरोधात जाऊन तिच्याशी एखाद्या मंगळ नसलेल्या मुलाने लग्न केल्यास त्या दाम्पत्यास अपत्यसुख नाही, असे फलज्योतिषाने भयसंकेत दिलेले आहेत. मग अगतिक झालेला मुलगा आणि त्याचा परिवार सहज विचार करतो की, ज्या सुखासाठी लग्न करायला निघालो ते सुख मिळणार नसेल तर कशाला धोका पत्करायचा? जर एखाद्या मुलीच्या कुंडलीत मंगळ ग्रहाची अनिष्ट दशा असेल तर तिचे लग्न मंगळ असलेल्या मुलाशीच करावे लागते. साहजिकच मंगळ असलेल्या मुलींना मंगळ असलेले मुलगे मिळण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे फलज्योतिषाने इथे स्त्रियांवर अधिक अन्याय केलेला आहे असे दिसून येते. मग मुलीचे आईवडील अगतिक होतात आणि मंगळ ग्रहाची भीती व संकट घालवण्यासाठी ज्योतिषांनीच उतारा म्हणून सांगितलेले वेगवेगळे उपाय करत राहातात. या भीतीपोटीच मंदिरातील मंगळ ग्रहाचे दर्शन, पूजा, उपासना, ग्रहशांती, अभिषेक आदी कर्मकांडे पार पाडत राहातात. भयभीत झालेली अनेक कुटुंबे केवळ याचसाठी अमळनेरच्या मंगळग्रह मंदिराच्या दर्शनाला येत असतात. मंदिरातून रिकाम्या हाताने परतू नये, अशी प्रथा असल्यामुळे मग दानदक्षिणा देणेही आलेच.

शनीची मंदिरे अनेक ठिकाणी निर्माण झाली. भारतात उज्जैन येथे ग्रहांचे मंदिर आहे. पण त्याठिकाणी अनेक ग्रहांमध्ये मंगळ हा एक ग्रह आहे. मूर्तीच्या रूपाने असलेले मंगळग्रह मंदिर फक्त अमळनेर येथे आहे. मंगळ ग्रहाचे भारतातील हे एकमेव मंदिर असल्याचा दावा हितसंबंधी व भक्तांकडून केला जातो. ग्रहांची दशा, कृपा-अवकृपा, त्यातल्या त्यात मंगळ ग्रहाचे परिणाम किती खतरनाक असतात, हे मानवी मनावर ज्योतिषांनी शतकानुशतके चांगलेच बिंबवलेले आहे. त्यावर ग्रहशांती, पूजा, अभिषेक यासारखे दैवी उपासना करण्याचे तोडगेदेखील सुचवलेले आहेत. केवळ याच भीतीतून मंगळग्रह मंदिर हे भक्तांचे श्रद्धास्थान बनलेले आहे. याच श्रद्धेच्या काळ्याबाजारातून मंदिर प्रशासनाचे मार्केटिंग सुरू झाले आहे. पुरस्कारांनी प्रोत्साहित होऊन मंदिराच्या व्यवस्थापनाकडून भाविकांना व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या ठिकाणी संस्थेने फार मोठ्या जागेवर बांधकाम केलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून पर्यटक मोठ्या संख्येने येऊ लागल्यामुळे बगीचा, दाट झाडी, प्राणी संग्रहालय अशा आकर्षणाच्या अनेक बाबी विकसित करण्यात आल्या आहेत.

सन १९९९ मध्ये या मंगळग्रह मंदिराचे जे 'मंगळग्रह सेवा संस्था' या नावाने विश्वस्त मंडळ स्थापन झाले त्यानंतर लोकसहभाग नि काम वाढत गेले. राजकारणाचा प्रभाव वाढत गेला तसा बघता बघता विश्वस्त मंडळात शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर अशा प्रतिष्ठित व्यवसायातल्या नामवंत मंडळींचा सहभागही वाढत गेला. दान आणि देणग्यांच्या रुपाने पैसा मिळू लागला. दूरदूरचे पर्यटक येऊ लागले. नारळ, फुले, हार यांची दुकाने थाटली गेली. उच्चशिक्षित व समाजातील वजनदार विश्वस्तांनी पुढाकार घेत सरकारी अनुदानासाठी प्रयत्न सुरू केले. त्याची पूर्वतयारी म्हणून पर्यटकांना जेवण देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे, कोरोना काळात अनेक

प्रकारची मदत देणे इत्यादी उपक्रम राबवले गेले. एवढी तयारी झाल्यानंतर त्यांच्या प्रयत्नांचे फळ म्हणून मंदिराला राज्य शासनाचा 'पर्यटन मित्र' पुरस्कार दिला गेला आणि मंदिराचे रूपांतर पर्यटनस्थळात झाले (मात्र हितसंबंधी आणि मंगळाचे भक्त हे सर्व मंगळाच्या कृपादृष्टीने झाले अशी आवई उठवू शकतात).

अमळनेर येथे दर मंगळवारी मंदिरात अभिषेक केले जातात. सुमारे हजार-अकराशे अभिषेक होतात. मंगळवारी पहाटे पाच ते सात यादरम्यान पंचामृत अभिषेक एका वेळेला एकाच कुटुंबाला करता येतो. त्यासाठी आगाऊ आरक्षण करावे लागते. मंगळवारच्या अभिषेकासाठी अडीच ते तीन वर्षांची प्रतीक्षा यादी आहे असे सांगितले जाते. दर पौर्णिमेला भजन होत असते. 'कुंकुम मार्शल' या नावाने देखील पूजा घातली जाते. खानदेशातील परिस्थितीने हतबल व अगतिक नागरिकांचे हे मंदिर एक श्रद्धास्थान झाले आहे. ही संस्था पुरस्काराने सन्मानित झाल्याचे फलक जळगाव शहरात राष्ट्रीय महामार्गावर झळकलेले होते. फलकांवर मंगळ ग्रह (मंगळ ग्रहाचा फोटो) एका बाजूला तर मंगळ ग्रह मंदिर दुसऱ्या बाजूला आणि त्यासोबत अनेकांचे फोटो असून त्यात काही प्रशासकीय अधिकारीदेखील होते.

अशा मंगळ ग्रह मंदिराला शासनाने आधी 'पर्यटनमित्र' पुरस्कार दिला. त्यातून पर्यटनस्थळ म्हणून भरभराट झाली. मंदिराचे उत्पन्न वाढले आणि त्या भांडवलावर मग विश्वस्त मंडळाने 'समाजसेवा' सुरू केली. त्या समाजसेवेसाठी 'मंगळग्रह सेवा संस्थे'ला सन २०२२-२३ चा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' दिला गेला आहे. दिनांक ७ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार या पुरस्कारासाठी पात्रतेचे निकष दिलेले आहेत. अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय जाती यांचे कल्याण, समाजातील शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंग, कुष्ठरोगी वगैरेंसाठी सामाजिक उत्थानाचे काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींसाठी हा पुरस्कार दिला जाणे अभिप्रेत आहे. या संस्थेचे कार्य पाहिले तर पर्यटक म्हणून आलेल्यांना आणि भाविकांना जेवण देणे, विद्यार्थ्यांना काही मदत करणे तसेच कोरोना काळातील सामान्य जनतेस केलेली मदत अशा गोष्टींचा समावेश दिसून येतो. संस्था ज्यासाठी स्थापन झाली त्यातील तत्त्वे पाहाता तिचे कार्य समाजात मुख्यत्वे वरीलप्रमाणे अंधश्रद्धा पसरविण्यासाठीच मदत करीत असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने पुरस्कार देताना वरील शासन निर्णयात नमूद केलेल्या समाजातील ज्या दुर्बल घटकांचा उद्धार आणि उत्थान होणे अपेक्षित आहे तो 'मंगळग्रह सेवा संस्था' करीत असलेल्या समाजसेवेतून दुरान्वयेही साध्य होणे शक्य वाटत नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे, 'आकाशातील ग्रहतारे जर माझे भविष्य ठरवत असतील तर माझ्या मेंदूचा आणि माझ्या मनगटाचा काय उपयोग?' तरीही ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशाप्रकारे अंधश्रद्धांना विरोध केला त्यांच्याच नावाने हा पुरस्कार देऊन एखाद्या संस्थेला शासनाकडून सन्मानित करणे हा केवळ विरोधाभास आहे. त्यामुळे प्रयत्नवादी, विवेकवादी विचारसरणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने हा पुरस्कार समाजकल्याणाच्या नावाखाली शासनाकडून दिला जाणे म्हणजे बाबासाहेबाच्या विचारांशी केलेली प्रतारणाच म्हणावी लागेल. हा पुरस्कार देण्यात कोणतेही समाजकल्याण तर नाहीच, उलट अंधश्रद्धेतून समाजाला काळाच्यामागे नेणाऱ्या प्रतिगामी क्रियाकलापांना पुरस्कृत करणे होय. सुजाण नागरिकांच्या मनात निश्चितच असा प्रश्न निर्माण होईल की, पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्र शासनाचा हा पुरस्कार समाजकल्याणाला प्रोत्साहन देणारा ठरेल की अंधश्रद्धांच्या प्रसाराला? 'मंगळग्रह सेवासंस्थे'ला देण्यात आलेला हा पुरस्कार शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रासाठी मुळीच भूषणावह नाही.

**(लेखक महाराष्ट्र अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प विभागाचे राज्यकार्यवाह आहेत.)**

●

**आवाहन**

**चमत्कार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २५ लाख रुपयांचे आव्हान समितीने दिले आहे. चमत्काराचा दावा करणाऱ्या व्यक्तींना समितीची आव्हान प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.**
**संपर्क : ९४०४८७०४३५**

# अंधश्रद्धेच्या गर्तेत राजकारण



**सुशीला मुंडे** । नवी मुंबई
९५७३६७३७०२

भारतामध्ये निवडणुका आणि अंधश्रद्धा यांचे नेहमीचेच रोगट असे नाते आहे. या निवडणुकीच्या काळात अनेक उमेदवार विविध अंधश्रद्धांच्या आश्रयामुळे प्रकाशझोतामध्ये येतात. उदाहरणार्थ, एखादा उमेदवार शुभाशुभ काळ, मुहूर्त पाहून निवडणूक अर्ज भरतो, तर कोणी प्रचारसभा भर स्मशानात घेतो. कुणी ३ किंवा १३ अशा संख्या अर्ज भरण्यासाठी अशुभ मानतो, तर कुणी आपल्या पारंपरिक कुलदेवतांचे दर्शन घेऊनच प्रचाराला लागतो. भारतीय व्यवस्थेत क्रिकेट, निवडणुका आणि सेलिब्रिटींच्या खाजगी गोष्टी यांना नको इतके महत्त्व आहे. पण तूर्तास निवडणूक पर्वात आपण निवडणुकांविषयीच बोलू.

निवडणुका आणि मतदानातील कल यांचा सांख्यिकी अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्रातील 'सेफॉलॉजी' नावाची एक शाखा असते. सेफॉलॉजीतील तज्ज्ञांच्या मदतीने जनकौलाची दिशा ठरवली जाते. परंतु जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात सेफॉलॉजीची जागा आज फलज्योतिषाने घेतली आहे. इथे प्रत्येक पक्षाच्या राजकारण्याची खास अशी काही ठिकाणे किंवा व्यक्ती असतात की, ज्यांच्या सल्ल्यानुसारच राज्य कसे चालवायचे, पदाची शपथ कधी घ्यायची, मंत्रिमंडळात कोणाची वर्णी लावायची, इत्यादी बाबी ज्योतिषी व्यक्तींच्या मर्जीने ठरतात. उदाहरणार्थ, १२ डिसेंबर २०१८ रोजी तेलंगणा राष्ट्रसमितीचे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव दुपारी तीन वाजून चार मिनिटांच्या दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार होते. अशी काटेकोर पण आडनीड वेळ कोणी निश्चित केली? कोणत्याही अधिकाऱ्याने नाही, तर केसीआर यांच्या प्रमुख ज्योतिषी लक्ष्मी धर्माचार्य यांच्या सल्ल्यानुसार निश्चित केली गेली. चंद्रशेखर राव भारतीय फलज्योतिषावरील त्यांच्या दृढविश्वासासाठी (की अंधश्रद्धेसाठी?) ओळखले जातात. ते ६ ही संख्या आपला भाग्यांक मानतात. त्यांच्यावर फलज्योतिषाचा पगडा असल्याची ओरड त्यांचे विरोधक नेहमी करताना दिसतात. त्यांनी ज्योतिषप्रेमातून विळा मोडून खिळा करण्यासारखे अनेक निर्णय घेतले आहेत. त्यांच्या या हट्टापायी तेलंगणा सचिवालयाची चांगली इमारत असतानासुद्धा कोट्यवधी रुपये खर्चून तथाकथित वास्तुशास्त्रानुसार ते नवीन इमारत बांधून घेतल्याची टीका त्यांच्या विरोधकांनी केली होती. चांगले सचिवालय असताना के. चंद्रशेखर राव तिथे बसून काम करीत नव्हते. कर जनतेने भरायचा आणि राजकारण्यांनी त्यांच्या अंधश्रद्धा कुरवाळण्यासाठी तो विध्वंसक व निरर्थक कामांसाठी ज्योतिषांच्या सांगण्यावरून उधळायचा. जनतासुद्धा अशा राजकारण्यांच्या हाती आपल्या राज्याचे सुकाणू देते; यास काय म्हणावे? अशा राजकीय नेत्यांकडून आपल्याला विवेकी वर्तन, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार इत्यादी बाबींची अपेक्षाच करता येणार नाही. अशा राजकीय व्यक्तिमत्त्वांमध्ये मोह, माया, सत्तेचा माज, लाचारी भरलेली असते. जनतेशी बांधिलकी, निष्ठा, कर्तव्य अशा बाबींचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून केव्हाच बाष्पीभवन झालेले असते. महाराष्ट्राचे स्मृतिशेष मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे सत्यसाईबाबांचे भक्त होते आणि त्यांनी आपल्या निवासस्थानी सत्यसाईबाबांचे आदरातिथ्य केले होते. त्यामुळे त्यांच्या हस्ते शासकीय पुरस्कार स्वीकारण्यास डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी ठाम नकार दिला होता. असे असते खऱ्या अर्थाने विवेकी आणि 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे वर्तन. अशी तत्त्वे आणि निष्ठा यांची अनेक उदाहरणे डॉ. दाभोलकरांनी आपल्या कार्यकर्त्यांसाठी घालून दिलेली आहेत. स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवणारे राजकारणी मात्र एवढी नैतिकता अंगी बाणवतील काय?

निवडणुकांमध्ये त्या त्या मतदारसंघात निवडून येणारा एकच विजेता असतो आणि तो विजयाचे श्रेय आपल्या ज्योतिषीला देत असतो. पण पराभूत मात्र अनेक

असतात आणि त्यांच्यापैकी कुणीही आपल्या ज्योतिषीला जाब विचारायला जात नाही. उलट मनातल्या मनात चरफडत म्हणणार, 'एवढा पाण्यासारखा पैसा वाटूनही लोकांनी पलटी मारली', 'अरे यार, कार्यकर्त्यांनीच ढापाढापी केली,' 'बचेंगे तो और भी लढेंगे', अशी मखलाशी करतात. पराभूत उमेदवार पराभवाचे विश्लेषण, त्याची कारणे शोधायचे कष्टही घेत नाहीत. विजेता उमेदवारही 'देवदेवतांच्या कृपे'ला विजयाचे श्रेय देत पंचक्रोशीतील सगळ्या देवतांना भेटी देत हिंडतो; तिथल्या पुजाऱ्यांच्या झोळ्या भरत बसतो. मात्र विजयाचे श्रेय मतदारांना कोणीच देत नाही.

तिथींप्रमाणेच ठिकाणेही शुभ किंवा अशुभ मानण्यामध्ये आपले राजकारणी आघाडीवर असतात. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशचा कोणताही पदासीन मुख्यमंत्री नोएडाला भेट देत नाही; कारण अशी अंधश्रद्धा आहे की, या शहराला भेट दिल्यानंतर त्याची त्या पदावरून गच्छन्ति होते आणि पुन्हा ते पद त्याला कधीही मिळत नाही. स्वतःला समाजवादी म्हणवणारे अखिलेश यादवदेखील नोएडापासून दूरच राहिले. मे २०१३ मध्ये झालेल्या एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या नोएडातील शिखर परिषदेला ते अनुपस्थित राहिले. नोएडामधील 'सिक्स लेन यमुना एक्स्प्रेसवे'चा विकास प्रकल्प ज्यावर रु. ३,३०० कोटी खर्च झालेला होता, त्याच्या लोकार्पण सोहळ्याला त्यांची उपस्थिती महत्त्वाची ठरली असती. परंतु तेव्हा त्यांनी लखनौहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्या सोहळ्याची बोळवण केली, पण नोएडात पाऊल ठेवले नाही. कारण तिथे गेल्यास सत्ता जाईल हा भ्रम डोक्यात ठासून भरलेला असावा. एरवी प्रसिद्धी, फोटो आणि एखाद्या प्रकल्पाचे श्रेय घेण्यासाठी हपापलेले मंत्रीगण ज्योतिषाने दिलेला सल्ला, शकून-अपशकून मात्र तंतोतंत पाळतात.

दादरीमधील झुंडबळी ठरलेल्या मोहम्मद अखलाकच्या कुटुंबीयांनाही अखिलेश यादव यांच्या भेटीसाठी लखनौला नेण्यात आले, पण अखिलेश दादरीला गेले नाहीत. त्यांच्या आधी मुलायमसिंह यादव, कल्याण सिंह आणि राजनाथ सिंह यांनीही या ना त्या कारणाने नोएडाला जाणे टाळलेले होते. आकाशातील त्या निर्जीव ग्रहगोलांची किती दहशत! खरे तर, या सगळ्या उदाहरणांमध्ये एका घटनेचा दुसऱ्या घटनांशी कुठल्याही कार्यकारणभावाने संबंध नाही. परंतु अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला माणूस असा तर्कशुद्ध विचार करू शकत नाही. निवडणुकांमध्ये विजय प्राप्त करण्यासाठी आपले कार्य, कर्तृत्व, जनसंपर्क, आपल्या स्वभावाच्या मर्यादा, भारतीय लोकशाही आणि भारतीय संविधान इत्यादीबद्दलचे ज्ञान/अज्ञान, जनतेचे प्रबोधन अशा सर्व परिणामकारक बाबींवर विचार न करता त्या दुर्लक्षित करून विरोधी उमेदवारांवर विजय प्राप्त करण्यासाठी 'शत्रुविजय यज्ञा'चे कर्मकांड पार पाडले जाते. काय आहे हे शत्रुविजय यज्ञ प्रकरण? असे सांगितले जाते की, बगलामुखी ही तांत्रिक देवी (ठिकाण नलखेडा, मध्यप्रदेश) आहे. इथे म्हणे तंत्रसाधना केली जाते. या ठिकाणी वेळोवेळी राजकीय नेते, अभिनेते, उद्योगपती, अधिकारी आणि सामान्य लोक आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर, शत्रूवर विजय प्राप्त करण्यासाठी येत असतात. त्यासाठी ते येथे येऊन हवन आणि अनुष्ठानादी कर्मकांडे करतात. या कर्मकांडांत होणारे विधी तंत्र आणि मंत्र दोन्ही पद्धतीने होतात.

निवडणुका जाहीर होण्याच्या दोन महिने आधीपासूनच येथे लोकांची वर्दळ सुरू होते. तिकीट मिळवण्यासाठी, प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविण्यासाठी, जिंकण्यासाठी देवीची आराधना करायला येथे लोकांची मोठी झुंबड उडते. तेवढ्यासाठी २४ तास होमहवन सुरू होते. देशाची धुरा अशा दैववादी, कर्तृत्वहीन लोकांच्या हाती जनता सोपविणार असते. स्वतः दैवाधीन, पराधीन, विवश असणारे हे लोकप्रतिनिधी भारत महासत्ता होण्याची 'गॅरंटी' कोणत्या कर्तृत्वाच्या आधारे देत असतात? अर्थात, अनेक नेत्यांच्या इथल्या भेटी गुप्त असतात. आपले बिंग बाहेर फुटू नये म्हणून फारच काळजी घेत असतात. तिथे गेल्याचे जाहीर होऊ नये किंवा तिथे लपतछपत जाणेही शक्य नसेल तेव्हा बऱ्याचदा आपल्यावतीने नातेवाईकांनादेखील तिथे यज्ञादी कर्मकांडे करण्यासाठी धाडले जाते. अनेकदा या भेटी रात्री उशिरा होतात. तसेच अनेक मंडळी यज्ञशाळेच्या मागच्या दारातून येऊन यज्ञाची कर्मकांडे उरकून मागच्या दारानेच चोरासारखे पसार होतात असे समजते. पांडवांनी कौरवांवर विजय मिळवण्यासाठी येथे साधना केली होती;

या वदंतेने मात्र दैववादी लोकांच्या मनाचा जोरकस ताबा घेतला आहे. मंदिरच स्मशानक्षेत्रात असल्याने चहुबाजूस स्मशानच आहे. त्यामुळे मंदिरपरिसरात लोकवस्ती नाही. गावसुद्धा येथून अर्धा किलोमीटर अंतरावर आहे. दुसऱ्याचे वाईट झाले तरच आपले भले होणार! अशा या तत्त्वावर आधारलेल्या तंत्रसाधनेचे विधी रात्रीच्यावेळी आणि सर्व अशुभ व नकारात्मक घटकांची जुळवणी करून अशुभ मानल्या गेलेल्या स्मशानात केले जातात. आतापर्यंत चार-पाच राज्यांचे मुख्यमंत्री यंदा येथे हजेरी लावून गेल्याचे तिथले प्रमुख पुजारी, पंडा सांगतात.

रमेश पोखरियाल हे उत्तराखंडचे मुख्यमंत्री असताना फलज्योतिषाची खुलेआम भलावण करत असत. वीस वर्षांपूर्वी केंद्रात भाजपचे सरकार असताना डॉ. मुरली मनोहर जोशींनीही फलज्योतिषाचा अभ्यासक्रम विद्यापीठात घुसवला. या राजकारण्यांची मतपेढी ही धर्माच्या आणि त्यातल्याही अंधश्रद्धांच्या अनेक धाग्यांनी बांधलेली असते. लोकसभेच्या निवडणुका जाहीर होण्याआधी राममंदिराचे उद्घाटन हेही मतदारांसाठी प्रलोभनच होते. मात्र यांचे अनेक मतदार शहरी व उच्चशिक्षित असूनही बुरसटलेल्या प्रतिगामी विचारांचे असतात, ते धर्माधारित दाव्यांची सत्यासत्यता तपासून पाहाण्यास तयार नसतात. अशा मतदारांच्या या मनोवृत्तीची पाठराखण करण्यासाठी, भुलवण्यासाठी राजकारणी काहीतरी छद्मविज्ञानी दावे करत राहातात. राजकारणी गळ टाकतच राहातात आणि या गळाला हे 'मासे' अडकतच राहातात. निवडणुका मग त्या लोकसभा, विधानसभा, महानगर पालिका जिल्हा परिषदा, पंचायत समित्या किंवा ग्रामपंचायतींच्या असू देत, अशावेळी अगदी दुर्लक्षित बुवा-बाबा, अम्मा-बापू, तांत्रिक-मांत्रिक, धर्माचार्य नि ज्योतिषाचार्य हे भूछत्रासारखे उगवतात. बऱ्याचदा वरवर वैज्ञानिक भासणाऱ्या घटना मुळात अवैज्ञानिकच असतात. परंतु त्यांना पुराणकाळातील दाखले देऊन जनतेची दिशाभूल केली जाते. याचे एक ताजे उदाहरण म्हणजे 'भारतीय विज्ञान काँग्रेस'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे सांगितले की, यापूर्वी भारतामध्ये प्लास्टिक सर्जरी होती. याचा पुरावा ते काय देतात? तर मानवी शरीराला चिकटवलेले हत्तीचे शीर. म्हणे इंटरनेट नि वाय-फायदेखील होते. पुरावा काय देतात? तर पुरोहित वर्गांच्या डोक्यावर गंधगोळीने रेखाटलेल्या चंद्रकोरी चिन्हाला वायफायच्या चिन्हाशी जोडतात. कुठेतरी खोदकाम करताना चपटी चीप सापडली तर यांचा निष्कर्ष काय? तर म्हणे पुराणकाळात पेन ड्राईव्ह होते. असं सगळं होतं तर मग ते मधल्या काळात कुठे गायब झालं? साधी दोन चाकी सायकलही नसताना म्हणे आमच्याकडे पुष्पक विमान होते आणि तेच तुकोबांना घेऊन गेले. विज्ञान उत्तरोत्तर प्रगत होत जाते, अवनत होत नसते. पेन ड्राईव्ह होते, हार्ड डिस्क होत्या तर मग सगळी शासकीय, निमशासकीय, बिनशासकीय माहिती कागदी फाईलींमध्ये का वर्षानुवर्षे कोंबून ठेवावी लागली? आपले ऋषीमुनी भूर्जपत्राचा वापर का करीत राहिले?

आपण विचार केला तर लक्षात येईल की, गेल्या दोन दशकांत अशा छद्मविज्ञानी दाव्यांचे प्रमाण फक्त राजकारणातच नव्हे तर समाजातही खूप वाढले आहे. असेही म्हणता येईल की, आपले राजकारणी लोकानुनय म्हणून त्यांच्या मतदारांना जे ऐकावेसे वाटते तेच बोलत असतात. टाळ्या आणि हशा मिळाल्या की वक्ताही खूश नि श्रोतेही खूश. अलीकडेच समाजात असा बदल का घडतोय, याची दोन ठळक कारणे समोर येतात. एक तर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, जो शालेय जीवनापासूनच दिसून येतो. दुसरे म्हणजे इंटरनेट, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट इत्यादीमुळे झपाट्याने होत असलेले दळणवळण. माहितीचा स्त्रोत धो धो वाहातच राहातो. एखाद्या घटनेची, माहितीची किंवा विधानाची सत्यासत्यता तपासून पाहाण्याआधीच ते सर्वदूर पोहोचून त्याने लोकांच्या मनाचा ताबा घेतलेला असतो आणि हा प्रोपागंडा लोकांनी सत्य म्हणून स्वीकारलेलाही असतो. काही महिन्यांपूर्वी साईबाबांची पालखी निघाली होती. पालखी मध्येच थांबलेली असताना श्रमपरिहारासाठी चहा बनवायची इच्छा पालखी वाहाणाऱ्यांना झाली. मग काय सिलिंडरमध्ये गॅस नसतानादेखील चहा तयार झाला. यातील सत्यता न तपासता सदर व्हिडिओ महाराष्ट्राच्या खेडोपाडी पोहोचला. मग अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सत्य काय आहे त्याचा शोध घ्यावा लागला. गॅस संपला असे जरी वाटत असले तरी गॅस सिलिंडरला जोडलेली पाइप नेहमीपेक्षा बरीच लांब

असल्यामुळे चहा होण्यास तेवढा गॅस पुरेसा होता. कधी कधी यात बऱ्याचदा वरकरणी वैज्ञानिक वाटणारा एखादा दाखला दिला जातो. या राजकारण्यांचे देशी गायींवरचे प्रेम सर्वश्रुत आहेच. कधी म्हणतात, गायीजवळ नुसते उभे राहिले की सर्व रोग बरे होतात. कधी म्हणतात की, देशी गायीच्या मूत्रात सोन्याचा अंश असतो; तर कधी म्हणतात, गायीच्या वशिंडातली एक विशिष्ट नाडी सौरऊर्जेचे रूपांतर स्नायूऊर्जेत करते. विशेष म्हणजे हे सगळे छद्मी शोध गेल्या दशकभरात फोफावले.

सध्या देशामध्ये लोकसभा निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकांच्या लढती अत्यंत अटीतटीच्या होत आहेत. त्यामुळे काही उमेदवार हे प्रतिस्पर्धी व मतदारांवर दबाव निर्माण करण्यासाठी जनतेतील अंधश्रद्धांचा गैरवापर करतात, जो गुन्हा आहे, तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. असे अघोरी प्रकार करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने जादूटोणाविरोधी कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते करत असतात; आणि जागरूक नागरिक म्हणून आपले कर्तव्य बजावतात.

मतदारांच्या मनातील अंधश्रद्धांचा गैरफायदा घेत भीती निर्माण करणाऱ्या या प्रकारांमध्ये, नारळावर हात ठेवून विशिष्ट उमेदवाराला मत देण्याची शपथ घ्यायला लावणे, देवाचा भंडारा-अंगारा उचलून मत देण्याविषयी शपथ घ्यायला लावणे, जवळच्या प्रसिद्ध देवस्थानावर मतदारांना नेऊन पुजाऱ्याकडून शपथ घ्यायला लावणे, मांत्रिक-तांत्रिकांना गांवामध्ये बोलावून महिला मतदारांवर दबाव निर्माण करणे, धर्मगुरूंना बोलावून मतदारांवर प्रभाव टाकणे, विरोधी उमेदवाराच्या अंगणात काळी बाहुली, लिंबू-मिरची, नारळ याचा उतारा टाकणे, विरोधी उमेदवारावर तथाकथित काळी जादू-करणीचा प्रकार करणे, मतदान करायला जाताना अमुक एका देवाचा नारा लावणे, असे निखळ अंधश्रद्धेचे अनेक प्रकार सध्या निवडणूक काळात घडत आहेत. जादूटोणाविरोधी कायद्यातील कलमांचा आधार घेत अनेक फौजदारी प्रकरणेदेखील आतापर्यंत दाखल झालेली आहेत आणि त्यामुळे अशा प्रकारांना काहीसा आळा बसलेला आहे. निवडणूक काळात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे अशा अनेक तक्रारी येत असतात. मीडियादेखील त्यावर प्रकाशझोत टाकते, परंतु यात जो नि:पक्षपातीपणा अपेक्षित असतो तो दिसून येत नाही.

समजुती आणि मनोवृत्तींना आकार देण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते. विज्ञानाच्याआधारे निसर्ग आणि व्यवहारातील घडामोडी समजून घेणारे लोक ज्या प्रमाणात वाढतील त्या प्रमाणातच समाजातील अंधश्रद्धा कमी होण्याची शक्यता असते. शिक्षण लोकांना माहितीचे सम्यक विश्लेषण करण्यासाठी आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आवश्यक ती क्षमता प्रदान करते. वैज्ञानिक ज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक अंतर्भाव झाला तर अंधश्रद्धांचा जनमानसावरील पगडा कमी होण्यास, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्यास मदत होईल. मात्र तरीही सांस्कृतिक संघर्ष, सामाजिक असुरक्षितता, गतानुगतिकता आणि मानसिक स्वास्थ्य अशा घटकांमुळे विज्ञानयुगातही अंधश्रद्धा फोफावत चाललेल्या आहेत असे दिसून येते. त्यामुळेच अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी काम करणाऱ्या चळवळींनादेखील मर्यादा पडतात; हे सुद्धा आपल्याला समजून घ्यावे लागेल. तशातही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने याबाबतीत सातत्य, चिकाटी व संयम टिकवला आहे, ही बाब कौतुकास्पद आहे.

**(लेखिका महा.अंनिसच्या राज्यकार्यकारिणीच्या निमंत्रित सदस्या आहेत.)**

●

## वाचक प्रतिक्रिया

नमस्कार, मार्च महिन्याचा अंक थोडा उशिरा वाचण्यात आला त्यामुळे प्रतिक्रिया थोडी उशिरा देण्यात येत आहे. यामध्ये 'सावित्रीचा विवेकी वसा' यामध्ये सुशीलाताईंनी चांगली माहिती दिलेली आहे, महिला विश्वमध्ये दोन्ही लेख चांगले आहेत. आपल्या संघटनेची महिला विभाग चांगला सक्षम होत आहे, याची प्रचिती त्यामुळे आली. ब्राईट्सबद्दल पण ऐकून होते; पण आता त्याबद्दल बरीच माहिती मिळाली. अशाप्रकारे अंक खूप छान झालेला आहे आणि असे अंक आम्हाला वाचायला मिळतील, याची खात्रीच आहे. संपादक मंडळाचे खूप खूप आभार, धन्यवाद!

**वर्षा उमरकर,** अकोला



# मासिक पाळी : गरज साक्षरतेची

**डॉ. माधुरी झाडे** । वर्धा
९५७३६७३७०२

मासिक पाळीमध्ये घेण्यात येणाऱ्या स्वच्छतेबाबत विचार केल्यास जागतिक पातळीवरच या संदर्भात प्रचंड अज्ञान दिसून येते. अनेक गैरसमज, धार्मिक प्रभाव सर्वत्र आढळतो. महिलांच्या सुदृढ शारीरिक, मानसिक आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळीबाबत साक्षरता वाढविणे आवश्यक आहे. मासिक पाळीचे चक्र हे साधारणतः २८ दिवसांचं असतं, त्यात साधारणपणे पाच दिवस रक्तस्राव होतो. म्हणजे प्रत्येक महिन्याला मासिक पाळी येते (प्रत्येक महिलेची मासिकपाळीचे चक्र थोड्या कमी, अधिक दिवसांचे असते). म्हणून 'वॉश युनायटेड' या जर्मनीस्थित स्वयंसेवी संस्थेने २०१३ मध्ये २८ मे मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन दिवस (Menstrual Hygiene Management Day) पाळण्यास सुरुवात केली. आता तो जगभर जागतिक मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन दिवस म्हणून पाळला जातो. विकसनशील देशांमध्ये मासिक पाळीच्या स्वच्छता सामग्रीची निवड महिलाच करतात. त्यामुळे ती निवड ही खर्चाची रक्कम, सामग्रीची उपलब्धता आणि सामाजिक नियमानुसार ठरत असते. मासिक पाळीच्या काळात स्वच्छता राखण्याकरिता स्त्रियांना आवश्यकता असणाऱ्या स्वच्छता उत्पादनांची उपलब्धता आणि ते वापरण्यासंदर्भातील जागरुकता महत्त्वाची आहे. याकरिता शालेय स्तरावरूनच मोठ्या प्रमाणात 'वयात येताना' कार्यक्रम घेऊन जागरुकता करायला हवी. आज अशा कार्यक्रमांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत प्रचंड अज्ञान, अत्यल्प माहिती, संकोच अथवा गैरसमजच अधिक दिसून येतात.

युनिसेफच्या (UNICEF) आकडेवारीनुसार संपूर्ण जगात १.८ अब्ज महिलांना, मुलींना दर महिन्याला मासिक पाळी येते. यापैकी कित्येकींना मासिक पाळीच्या काळात समाजातील अनिष्ट चालीरीतींमुळे अपवित्र भावनेने दूर ठेवले जाते. त्यामुळे त्यांना समाजात विविध अडचणींना तोंड द्यावे लागते. मासिक पाळीतील स्वच्छता न पाळल्यामुळे त्यांना आरोग्याच्या विविध समस्यांना तोंड द्यावं लागतं, काही मूलभूत सुविधांपासून वंचित राहावं लागतं. जसे की, स्वच्छ स्वच्छतागृहे, स्वच्छ व निर्जंतुक अशी मासिक पाळीच्या काळात वापरावयाची साधने; उदाहरणार्थ, मासिक पाळीत वापरावयाचे पॅड (Menstrual Pad), कप (Menstrual Cups), टॅम्पून (Organic Cotton Tampons), अंतर्वस्त्रे (Period Panties, Reusable Cloth Pads) इत्यादी. अनेक महिलांना तर आजही अशा साधनांबाबत काहीच माहिती नाही.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आजही मासिक पाळी संदर्भातील स्वच्छता आणि व्यवस्थापनाबाबत प्रतिबंध करणारे सांस्कृतिक, सामाजिक तसेच धार्मिक असे अनेक अडथळे आहेत. देशाच्या विविध भागांत मुख्यत्वेकरून ग्रामीण भागातील मुली, महिलांमध्ये मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत साक्षरता नाही. त्यामुळे त्यांना प्रजनन इंद्रियांशी संबंधित विविध आजारांना सतत समोरे जावे लागते. यासंदर्भातील अज्ञान, संकोच यामुळेच वैद्यकीय सुविधांपासून त्या वंचित राहातात. घरी, शाळेत तसेच कामाच्या ठिकाणी महिलांना मासिक पाळी व्यवस्थापनाच्या बाबतीत अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. मासिक पाळीतील व्यवस्थापनाबाबत अत्यल्प, अपूर्ण अथवा चुकीची माहिती असल्यामुळे मुली व महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासातही अडथळे निर्माण होतात. महिला व मुलींना प्रजनन इंद्रियांशी संबंधित जंतूसंसर्गाबाबत (RTI-Reproductive Tract Infection) माहिती नसते. मासिक पाळीच्या काळात ग्रामीण भागातील महिला, मुली सॅनिटरी पॅड आर्थिक दुर्बलतेमुळे विकत घेऊन वापरू शकत नाही. त्या एकाच कापडी पॅडचा पुन्हा पुन्हा वापर करतात. त्यातही त्यांना या पॅडच्या स्वच्छतेबाबत माहिती नसल्यामुळे जंतूसंसर्गांची शक्यता वाढते. म्हणूनच त्यांना सॅनिटरी पॅडचे महत्त्व विशद करायला पाहिजे. त्यांना कमीत कमी

किमतीत ते उपलब्ध करून द्यायला हवेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे 'बेस्ट फ्रॉम वेस्ट'चा वापर करून देखील सॅनिटरी पॅडची निर्मिती काही ठिकाणी केली जाते आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतामध्ये २७% महिला या कॅन्सरमुळे मृत्युमुखी पडतात. जगातील इतर देशांच्या तुलनेत हे प्रमाण भारतामध्ये अधिक आहे. यापैकी एक कारण हे मासिक पाळीतील अस्वच्छतेमुळे झालेला जंतूसंसर्ग हे देखील आहे. यावरून आपल्याला हे लक्षात यायला हवे की, मासिक पाळीमध्ये स्वच्छता पाळणे आणि त्या संदर्भातील समाजामध्ये जागरुकता निर्माण करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मासिक पाळी ही तशी नैसर्गिक शारीरिक क्रिया आहे. जागतिक आरोग्य संघटनेने नमूद केल्यानुसार वयाच्या १० ते १९ या वयात कधी तरी मासिक पाळी सुरू होत असते. हे वय व्यक्तिसापेक्ष आहे. त्यानंतर साधारणपणे ३५ ते ४० वर्षानंतर कधीही Menopause येऊ शकतो, म्हणजेच मासिक पाळी जाऊ शकते. हे वयदेखील व्यक्तीसापेक्षच आहे. साधारणतः प्रत्येक महिला ही ३० ते ३५ वर्षे मासिक पाळीचा काळ अनुभवत असते. ३० ते ३५ वर्षांच्या या संपूर्ण कालखंडामध्ये आपल्या देशाच्या काही भागांमध्ये महिलांना बहिष्काराची वागणूक दिली जाते. जसे की, आजही मासिक पाळीत अंघोळ करणं, मासिक पाळीत वापरलेल्या साधनांची विल्हेवाट लावणं, व्यवस्थापन करणं याबाबतीत अडचणी येतात. तिला घरात इतरत्र कुठेही वावरू देत नाहीत. तिने स्वयंपाक करणं, नेहमीच्या जागेवर झोपणं यावर प्रतिबंध लावले जातात. एवढेच नाही तर या काळात तिला दिली जाणारी वागणूकदेखील अस्वच्छतेची असते. मुळात ती अपवित्र आहे ही भावनाच महिलांचं मानसिक शोषण करणारी आहे.

आजच्या विज्ञानयुगातदेखील पाळी आलेल्या महिलांना, मुलींना अस्वच्छ, अपवित्र समजलं जातं. याची पाळेमुळे कुठेतरी भारतीय संस्कृती, संस्कार, धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा यांच्याआधारे खोलवर रुजली आहेत. स्त्रियांच्याबाबतीत घडणाऱ्या या नैसर्गिक शारीरिक क्रियेला अपवित्र समजून तिला तुच्छ मानलं जातं, तिची अवहेलना केली जाते. यात आपण मानवी मूल्यांचीच पायमल्ली करतो याची जाणीव समाजात नाही. या सर्वात वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक तसेच आर्थिकही शोषण आहे. आपण हे कधी समजून घेणार आहोत? मासिक पाळी आणि व्रतवैकल्य यांचा संबंध या विषयावर संशोधन केले असता काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत. शारीरिक बदलांमुळे मासिक पाळी येते असे ७० टक्के महिलांना माहिती असलं तरी देखील मासिक पाळीच्या काळात धार्मिक सहभाग घेतल्यास देवाचा कोप होईल, चांगल्या कार्यात विघ्न येईल अशी अपराधीपणाची भावना आजच्या आधुनिक काळातही ७५% महिलांमध्ये दिसून येते. घरातील मंडळी रागवतात म्हणून आम्हीच धार्मिक कार्यात सहभागी होत नाही असेही ७८% महिलांनी सांगितले. त्यांना स्वतःला मासिक पाळी अपवित्र आहे असे वाटत नसले तरी घरातील व्यक्तींना नाराज करू नये, वाद नको म्हणून अलग, शांत बसणं योग्य, असे त्यांना वाटते. मासिक पाळी अपवित्र असते अशी जाणीव कुटुंबातील, समाजातील लोक सातत्याने करून देत असतात, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. मासिक पाळीमध्ये स्त्रिया अपवित्र असतात याच धारणेमुळे त्यांना कुटुंबामध्ये दुय्यम स्थान दिले जाते, असे ९२ टक्के महिलांनी सांगितले. असे असताना देखील आपल्या समाजामध्ये या संदर्भातील वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याकरिता आजही आपले प्रयत्न कमी पडतात हे जाणवतं.

मासिक पाळी म्हणजे 'प्रॉब्लेम', अडचणीची, नकोशी स्थिति, असाच समज असतो. महाविद्यालयात एखादी मुलगी महत्त्वाच्या प्रसंगी आली नाही म्हणून आवर्जून विचारणा केली असता 'मॅडम, तिचा प्रॉब्लेम आहे', असे उत्तर येते. मासिक पाळी ही नैसर्गिक शारीरिक क्रिया आहे, ती प्रॉब्लेम कशी काय असू शकते? याचं कोडं मला आजवर उमगलेलं नाही. मासिक पाळीविषयी समाजात आजही मोठ्या प्रमाणात अज्ञान गैरसमज आहे हेच यातून दिसून येतं. मासिक पाळीच्या दिवसांत महिलांना वेगळी जागा, चार-पाच दिवस बाहेर बसणं, देवळात जाणं बंद, काही ठिकाणी तर त्यांच्याकरिता चक्क वेगळी झोपडी असते. पाचव्या दिवशी केस धुवून, आंघोळ करूनच पूर्ववत सहभागी करून घेतलं जातं. अशा रूढी, प्रथा सर्वच धर्मांत

कमीअधिक फरकाने सर्वत्र आढळून येतात. आधुनिक काळात वैज्ञानिकांनी केलेल्या अनेक संशोधनांमुळे वैद्यकीय क्षेत्रातदेखील बरीच संशोधने झालेली आहेत. खंत एकच आहे की, मासिक पाळी येण्यामागचं विज्ञान समजूनही महिलांचं या संदर्भातील मानसिक, शारीरिक, आर्थिक (सर्व गोष्टींवर खर्च केला जातो; पण पॅडवर खर्च करताना विचार केला जातो) शोषण थांबलेलं नाही. पाळीमागचं विज्ञान समजलं आणि त्या वैद्यकीय ज्ञानाच्या उपयोगाने पाळीवर परिणाम करणाऱ्या गोळ्या काढल्या गेल्या. त्यांचा उपयोगदेखील पाळीच्या अपवित्र्याच्या पारंपरिक कल्पना, अंधश्रद्धा अधिक दृढ करण्यासाठीच केला जातो. याचा अर्थ असा की, आपल्या धार्मिक रूढी, परंपरा अधिक घट्ट करण्याकरिता आधारही तर आपण विज्ञानाचाच घेतो ना? हे आम्ही कधी समजणार आहोत? निसर्गनियमानुसार वेळेत आलेली मासिक पाळी चालत नाही आणि औषध घेऊन थोपवून ठेवलेली, त्यानंतर पुढे आलेली पाळी चालणार. खरं तर स्वतःला शिक्षित, सुसंस्कृत म्हणून घेणाऱ्या महिलाच या औषधांचा वापर अधिक करतात, हे अभ्यासांती दिसून आलेले आहे. ६१% महिला या सणासुदीच्या काळात व्रतवैकल्य करण्याकरिता मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतात. त्यातही विशेष म्हणजे ५९% महिला या डॉक्टरांना न विचारता स्वतःच मेडिकलमध्ये जाऊन गोळ्या विकत घेतात. त्यांना हेही माहिती असतं की, या गोळ्यांचे त्यांच्या शरीरावर विपरीत परिणाम घडतात. गोळ्यांचा वापर केल्यानंतर पुढील मासिक पाळी येताना पोटात तीव्र वेदना होणे, हातपाय दुखणे, मळमळ, उलटी, मानसिक अस्वस्थता इत्यादी त्रास होतात. या सर्व त्रासांना सामोरे जावे लागत असल्यामुळे गोळ्या घेणाऱ्या महिलांपैकी ७०% महिला या इतरांना या गोळ्या घेण्यासाठी प्रोत्साहित करत नाहीत, हे विशेष. परंतु हा त्रास सहन करून देखील धार्मिक कार्य पार पडावे म्हणून मासिक पाळी लांबविण्याकरिता गोळ्या घेणे त्यातच त्यांना धन्यता वाटते, हेही सत्य नाकारता येत नाही.

या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो संत सोयराबाईंचा. त्या काळातदेखील संत सोयराबाईंनी मासिक पाळीच्या संदर्भात केलेलं प्रबोधन हे महत्त्वपूर्ण ठरतं. संत सोयराबाई प्रश्न विचारतात,

'देहीचा विटाळ देहीच जन्मला;
सोहळा तो झाला, कवण धर्म?
विटाळावाचून उत्पत्तीचे स्थान,
कोण देह निर्माण, नाही जगी?'

यातून आपल्या लक्षात येतं की, संत सोयराबाईंनी मासिक पाळीच्या संदर्भात आपले विचार चांगल्या तर्कशुद्ध रीतीने व्यक्त केलेले आहेत. प्रश्न विचारून, चिकित्सा करून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र आधुनिक वैज्ञानिक तंत्रयुगाच्या काळातही मानसिकता बदलण्याची आपली तयारी नाही. अज्ञानातच राहाण्यात धन्यता मानतो. समाजाला मासिक पाळी येण्यामागील विज्ञान माहिती करून घेऊन त्या संदर्भातील डोळस वृत्ती अंगीकारण्याची आवश्यकता आहे. शारीरिक स्वच्छता ठेवणं अत्यंत महत्त्वाचं आहे. शरीरासोबतच आपल्या मनात असणारे अनेक गैरसमज वैज्ञानिक माहिती घेऊन काढून टाकू या. मानसिक गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्यासाठी आपण स्वतःच प्रयत्न करू या. तरच खऱ्या अर्थाने मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन दिन साजरा केला जाईल.

- समाजाच्या कल्याणासाठी पुढील बाबी करणे आवश्यक आहे.
- मासिक पाळी संदर्भात समाजाला साक्षर करणे अत्यंत आवश्यक आहे.
- मासिक पाळीमध्ये महिला या अशुद्ध नसतात या संदर्भात माहिती घेऊन ज्ञान वाढवणे आवश्यक आहे.
- वयात येणाऱ्या प्रत्येक मुलीला मासिक पाळीबाबत वैज्ञानिक माहिती देण्याची सुरुवात करायला हवी.
- मुलींसोबतच मुलांनाही मासिक पाळीबाबतची माहिती द्यायला हवी, यामुळे मुलेदेखील आपली आई, बहीण, पत्नी यांची काळजी घेतील.
- मासिक पाळी येण्याचे कारण, मासिक पाळी येण्याचे महत्त्व, मासिक पाळीत करण्यात येणारी स्वच्छता तसेच वापरण्यात येणाऱ्या साधनांच्या व्यवस्थापनाविषयी अद्यावत माहिती देण्यात यावी.
- खरं तर, ही सुरुवात शाळांमधून झाल्यास प्रत्येक मुलीला या संदर्भातील माहिती मिळेल.

**(पृष्ठ क्रमांक ३२ वर)**

# उत्साहवर्धक विदर्भ दौरा

महा. अंनिसच्या राज्य कार्यकारी समिती बैठकीत ठरल्यानुसार विदर्भातील जिल्ह्यांचा संघटनात्मक दौरा करण्याचे ठरले होतेच. विदर्भातील कार्याचा आढावा घेण्यासाठी त्यातील जिल्ह्यांना भेटी द्याव्यात या उद्देशाने राज्य कार्याध्यक्षांनी यावेळी विदर्भ दौऱ्याची आखणी केली.

दि. २८ ते ३१ मार्च, २०२४ या चार दिवसांत मी अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम या चार जिल्ह्यांना भेटी दिल्या. या जिल्ह्यांमधील संघटनात्मक काम अनेक वर्षे चांगलेच चालले आहे. पण कोविड काळापासून वेग मंदावला होता. या प्रत्येक जिल्ह्यात एक पूर्ण दिवस याप्रमाणे शाखा व जिल्हा बैठका, हितचिंतक व कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत भेटी, चर्चा, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना आवश्यक ती मदत व मार्गदर्शन करणे, त्यांनी केलेल्या कामासाठी प्रोत्साहन देणे, विवेकवाहिनींबाबत महाविद्यालयांना भेटी देणे अशा महत्त्वाच्या बाबी या दौऱ्यात साध्य झालेल्या आहेत. राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार यांनी जिल्ह्यातील कार्याध्यक्ष व प्रधान सचिवांशी संपर्क करून नियोजनाप्रमाणे भेटी दिल्या; बैठका झाल्या. विदर्भात संघटनेची कामे एकंदरीत योग्य दिशेने चालू आहेत. त्यांचा वेग टिकवून ठेवण्यासाठी सतत फोनने, मेसेजने संपर्कात राहाणे, नियमित बैठका घेणे, नियोजन करणे, जबाबदाऱ्यांचे वाटप, पाठपुरावा करणे या बाबींवर सविस्तर चर्चा झाल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राज्य पदाधिकारी गेल्याने जास्तीत जास्त कार्यकर्ते भेटले, वैयक्तिक चर्चा झाल्या. त्यांच्या अडचणी समजून घेता आल्या. त्यांच्या मनातील शंकांचे निरसन करता आले. विशेष म्हणजे संघटनेचे हितचिंतक, पाठीराखे, आधारस्तंभ यांच्या भेटी झाल्या. कार्यकर्त्यांच्या घरीच मुक्काम असल्याने जो भावनिक, कौटुंबिक आणि संघटनात्मक जिव्हाळा होता तो वृद्धिंगत झाला.

बैठकांतील काही सर्वसाधारण निर्णय असे –

- संघटनेच्या १९ विभागांपैकी कोणत्या विभागांचे काम पुढे नेण्यास अधिक वाव आहे याचा आढावा प्रत्येक जिल्ह्यात घेण्यात आला. यासाठी शाखा आणि जिल्ह्याच्या नियमित बैठका घेण्याचे महत्त्व अधोरेखित झाले.
- वर्षाच्या नियोजनानुसार व्यक्तिगत तसेच सामूहिक जबाबदाऱ्या पार पडल्या जात आहेत ही एक समाधानकारक बाब आहे. अशीच वाटचाल शाखांनी चालू ठेवावी.
- महा. अंनिस शाखेच्या नियमित बैठका घेण्याचे व त्या बैठकांना शहरात राहाणाऱ्या जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून शाखांच्या कार्याचे नियोजन करावे.
- प्रत्येक जिल्ह्यात संघटनेचे राज्य पदाधिकारी आहेत. त्यांनी संघटना बांधणी आणि जिल्ह्याच्या शाखांच्या कामात वाढीसाठी पुढाकार घ्यावा.
- जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे संघटनात्मक प्रशिक्षण, चमत्कार सादरीकरण प्रशिक्षण, प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांसाठी वैज्ञानिक जाणिवा, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.
- विवेकवाहिनी सुरू करणे व प्रत्येक विवेकवाहिनीचे निवडक तरुण, तरुणी यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर घेण्याचे ठरले.

महा. अंनिसने ज्यांचा आंतरजातीय विवाह लावून दिला त्या अमरावती येथील भारती मनोज मानकर यांचे पहिल्याच दिवशी आग्रहाचे निमंत्रण स्वीकारले. प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, गायत्री आडे, प्रवीण गुल्हाणे, प्रा. डॉ. राजकुमार दासरवाड, शंतनु पांडव, विनोद चोंडकें, अकोला येथे प्रा. संजय तिडके, प्रा. बबन कानकिरड, महादेवराव भुईवार, बुलढाणा येथे प्रा. वसंत आंबेकर, प्रदीप हिवाळे, अरविंद शिंगाडे, पंजाबराव गायकवाड, वाशिम येथे विजय शिंदे, महेश देवळे, पी. एस. खंदारे, ॲड सोनवणे व असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले व संकल्पबद्ध झाले. हा दौरा नियोजनानुसार फलद्रूप होण्यासाठी राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार यांनी घेतलेले परिश्रम खूप कामी आलेत असे म्हणावे लागेल. या जिल्ह्यातील सर्वांनी खूप चांगल्या पद्धतीचा सहभाग नोंदवला व जिल्ह्यात संघटना विस्तारासाठी आपण कटिबद्ध आहोत, असा निर्धार व्यक्त केला. त्याबद्दल त्या त्या जिल्ह्यातील सर्वच कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार. पुन्हा भेटू या, विवेकाचा आवाज बुलंद करू या.

**शब्दांकन : माधव बावगे**

# संघटनेला बळ देणारा विदर्भ दौरा

लहानशा खिशातही ठेवता येऊ शकेल, अशी जादूटोणाविरोधी कायद्याची मिनीपुस्तिका बनवणारे यवतमाळच्या दिग्रस येथील शाखेचे कार्याध्यक्ष प्रदीप नगराळे, संघटना बांधणीच्या माझ्या लेखांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण आणि भाषणातून संदर्भ शोधून काढणारा यवतमाळचा युवा साथी रूपेश वानखेडे, गेली पाच वर्षे संघटनेच्या कामातून फुरसत न मिळालेल्या आणि संघटनेच्या निमित्ताने केवळ फिरताना स्वतःच्या सख्ख्या भाचीला भेटणारा समर्पित कार्यकर्ता विष्णूदास लोणारे, आपला निवास असलेल्या संपूर्ण कॉलनीलाच अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे सभासद करणारे गडचिरोलीचे विठ्ठलराव कोठारे, घरातील वरचा मजला एक सुसज्ज हॉल करून कायमस्वरूपी संघटनेच्या कार्यक्रमासाठी रिकामा ठेवणारे गडचिरोलीचे विलास निंबोरकर, पंच्याहत्तरी पार करूनही सेवा दलाच्या विचारांच्या भव्य संस्थेचा पाठिंबा मिळवणारे चंद्रपूरचे पी.एम.जाधव, माझ्यासोबत दौऱ्यात असतानाही नागपूरचे प्रशिक्षण यशस्वी व्हावे म्हणून धडपड करणारे, सतत फोन करून प्रशिक्षणाला येण्याचा आग्रह धरणारे गौरव आळणे, धुलिवंदनाच्या सुट्टीच्या दिवशीही शिबिर यशस्वी करणारे, सायंकाळी भाषण लावणारे वर्ध्याचे सर्व साथी, ऑस्ट्रेलियात राहून, मी आपल्या संघटनेसाठी काय करू शकतो? पैशांची तर मी मदत करीनच, पण मी संघटनेसाठी अजून काही करू शकतो का? असा मदतीचा हात देणारा सचिन झाडे, (डॉ. माधुरी झाडे यांचा लहान भाऊ) सर्व दौरा आटोपून नागपूरहून ट्रेनने परत निघताना, वर्धा रेल्वे स्टेशनवर रात्री अकरा वाजता मला आवडणारी नाचणीची बिस्किटं घेऊन येणारी डॉ.माधुरी झाडे आणि तिचा जोडीदार हरीश पेठकर आणि या साऱ्या दौऱ्याचं मिनिट टू मिनिट नियोजन करून देणारे विदर्भाचे प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, केजी टू पीजी अशी भव्य शिक्षणसंस्था चालवणारे राज्य सरचिटणीस संजय शेंडे अशा कितीतरी साथींचा मनसोक्त सहवास, त्यांच्यापासून मलाच मिळणारी प्रेरणा, भरपूर लाड, भरपूर सन्मान आणि अपार प्रेम म्हणजे माझा विदर्भ दौरा. मार्च महिन्याचा अखेरचा आठवडा, होळीची पूर्ण सुट्टी. कार्यकारी समितीच्या बैठकीत मी विदर्भाचा दौरा करायचे ठरले. पूर्ण सात दिवस सात जिल्हे, आणि बावगे सरांचे चार जिल्हे, असा पूर्ण विदर्भ कव्हर करावा असा निर्णय झाला. उत्साहाने सात दिवसांचा दौरा ठरवला, पण नंतर मला वाटत होते की, उगीचच आपण सात दिवसांचा दौरा ठरवला, तीन किंवा चार दिवसांचा करायला हवा होता. उन्हाळ्याचे दिवस, मध्ये काही वर्किंग दिवस, मध्ये काही सुट्ट्या, एवढे जमेल का? आपला आवाज इतके सात दिवस टिकेल का? काही आजारपण आलं तर? अशा शंकांनी मन घेरलेलं. पण ठरलं होतं, म्हणून काहीच बदल केला नाही. पण हा दौरा प्रचंड यशस्वी ठरला. ७ जिल्हे, ३ जाहीर भाषणं, ६ प्रशिक्षण शिबिरे, ३१५ कार्यकर्त्यांची उपस्थिती, ३० गृहभेटी असा भरगच्च दौरा पार पडला.

२५ मार्च, २०२४ ला धुलिवंदनची सुट्टी होती. पण वर्धेचे साथी मात्र दुपारी तीन ते सायंकाळी सात वाजेपर्यंत संघटना बांधणी प्रशिक्षणाला हजर होते. सायंकाळी 'देव, धर्म, नीती आणि भारतीय संविधान' यावर भाषण झाले. त्यालाही चांगली उपस्थिती होती. आपली वर्धा शाखा विविध क्षमता असलेल्या अनेक कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे. सारिका डेहनकार, प्रकाश कांबळे, निखिल जवादे, द्वारकाताई इमदवार, कविता राठोड, शंकर, प्रितेश म्हैसकर, अरुण भोसले, सुनील ढाले, भरत कोकावार अनेक कार्यकर्ते प्रत्यक्ष भेटले. अनेक कार्यकर्त्यांच्या गृहभेटी झाल्या. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात चढउतार येत असतात. त्याबद्दल संघटनात्मक चर्चा झाली. संवादी राहात, उणिवांवर मात करत पुढे जाण्याचा संकल्प घेतला. शाखाभेटीचे नियोजन केले आणि त्यांच्या शाखाभेटी सुरूही झालेल्या आहेत.

दुसऱ्या दिवशी यवतमाळला गेलो. सुरेश वरभे अनेक वर्षे यवतमाळमध्ये काम करीत आहेत. महाविद्यालयातून सुट्टी घेऊन डॉ.माधुरी झाडे स्वतःच्या कारने सोबत आली. वरभे सरांनी घरी प्रेमाने आदरातिथ्य केले आणि जवळपास २५ कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत दिवसभर विचार आणि संघटना बांधणी शिबिर पार पडले. काम करण्याची प्रचंड इच्छाशक्ती असलेले कार्यकर्ते भेटले. आपणच कार्यकर्त्यांशी बोलायला, भेटायला, त्यांना प्रशिक्षण द्यायला कमी पडतो, याची जाणीव

झाली. सायंकाळी वर्ध्याला परत आलो. डॉ. माधुरी झाडे आणि प्रा.हरिश पेठकर यांचा लग्नाचा वाढदिवस. कुटुंब आणि मित्रपरिवाराने आयोजित केलेल्या या लग्नाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहाता आले. संघटनेमुळे मिळालेल्या विस्तारित कुटुंबाचा स्नेह अनुभवला. विचारांसोबतचे भावनिक बंध संघटनेला मजबूत करतात. प्रा.मधु दंडवते यांचे एक वाक्य आठवलं, कार्यकर्त्याचा एक हात पुस्तकावर, तर दुसरा हात हृदयावर असावा. विचारांसाठी एकदिलाने लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा भावबंध जुळलेला समूह निर्माण करणे, त्याचा विस्तार करणे म्हणजेच संघटना बांधणी, दुसरं काय!

रात्री परत वर्ध्याला मुक्काम करून सकाळी गोंदियासाठी ट्रेनने निघालो. त्याच ट्रेनने नागपूरहून गौरव आळणे होते. गोंदियाला एका क्लासमध्ये व्याख्यान आणि काहींच्या भेटी असे झाले. भंडाऱ्याहून विष्णूदास लोणारेही आले होते. गोंदियामध्ये आपले काम कमी आहे तेथे आपल्याला खूप प्रयत्न करायला हवेत. भेटीगाठीच्या निमित्ताने संतोष खोब्रागडे यांनी आम्हाला पूर्ण गोंदिया शहर फिरवले. गोंदियाहून आम्ही सायंकाळी ट्रेनने गडचिरोलीसाठी निघालो. वडसा रेल्वे स्टेशनला उतरलो. विविध नाट्यकलावंत आणि नाटकवेड्या लोकांचे हे गाव असल्याचे समजले. स्वतः विठ्ठलराव कोठारे आपल्या शिक्षकमित्रासह कारने आम्हाला घ्यायला आले होते. ताडोबा जंगलाचा रस्ता कापत आम्ही रात्री गडचिरोलीला पोहचलो. गडचिरोलीला येण्याआधीच कोठारे सरांनी मला फोन करून विचारलेले, सर, तुम्हाला नॉनव्हेज चालते का?, मी म्हटले, 'हो'. घरी आमच्यासाठी खास बेत केलेला होता. मोठे झिंगे. कोठारे काकू प्रेमाने वाढत होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी एका शासकीय विद्यालयाच्या वर्गात भरगच्च उपस्थितीत संघटना बांधणी आणि विचार प्रशिक्षण शिबिर पार पडले. महिलांसह एकूण ८५ उपस्थिती होती. गडचिरोलीच्या सर्व साथींची ही मेहनत होती. आपल्या पत्रिकेचे एकूण ५१९ वर्गणीदार गडचिरोलीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील हा उच्चांक आहे. संघटनेचे अध्यक्ष शंकर राऊत यांची गृहभेट घेतली. त्यांचे स्वतःचे यूट्यूब चॅनेल आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राचे ते वार्ताहर आहेत. त्यांना भेटून छान वाटले. महाराष्ट्र राज्याच्या एका टोकाच्या आदिवासी जिल्ह्यांमध्ये प्रचंड काम आपल्या कार्यकर्त्यांनी उभे केले आहे. हे सारे मलाच प्रेरणा देणारे होते, ऊर्जा देणारे होते. प्रचंड मेहनत घेणारे आपले कार्यकर्ते, श्रमाचा कोणताही अभिनिवेश जराही न आणता, समर्पित भावनेने गेले अनेक वर्षे ते काम करीत आहेत. गडचिरोलीत महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

गडचिरोलीलाच मुक्काम करून आम्ही सकाळी बसने चंद्रपूरसाठी निघालो. पी.एम.जाधव सरांशी गौरव आळणे सर संपर्कात होते. विलास निंबोरकर आमच्यासोबत आले. बसने प्रवास करत बरोबर बारा वाजता आम्ही चंद्रपूरला पोहचलो. राष्ट्रसेवा दलाच्या विचारांची प्रचंड मोठी शिक्षणसंस्था आपल्याला मदत करते. आपणास ऐकून आश्चर्य वाटेल, त्या शिक्षणसंस्थेतील प्रत्येक शिक्षक हा अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा वर्गणीदार आहे. स्वतः शिक्षणसंस्था जाहिरातही देते. पी. एम. जाधव सर, चव्हाण सर यांच्या प्रयत्नाने हे घडले. चंद्रपूर जिल्हा न्यायालयातील विधी सेवा प्राधिकरणात नोकरी करणारे धुळे शाखेतील साथी ॲड. विनोद बोरसे यांची भेट आनंद देऊन गेली. चंद्रपूरहून आम्ही ट्रॅव्हल्सने तिघे नागपूर मुक्कामाला गौरव आळणे यांच्याकडे जेवून झोपलो. पहाटेच आम्हाला भंडाऱ्याला निघायचे होते.

पहाटे लवकर उठून तयारी करून सहा वाजता बस पकडली आणि साडेसात वाजताच भंडाऱ्याला पोहोचलो. प्रा. युवराज खोब्रागडे, विष्णूदास लोणारे दोघे साथी भेटले. सकाळी जिल्हा परिषदेच्या हायस्कूलला कार्यक्रम केला आणि दुपारी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर पार पडले. भंडारा शिबिर संपवून विलास निंबोरकर गडचिरोलीला गेले आणि मी अनमोल कावळे नावाच्या कार्यकर्त्यासोबत बाईकने नागपूरला पोहोचलो. मध्येच पावसाने हजेरी लावली. धो धो पाऊस. नागपूर मुक्काम. सकाळी नागपूरच्या शिबिरालाही उदंड प्रतिसाद मिळाला. जिथे चाळीस कार्यकर्त्यांची अपेक्षा केलेली, तिथे ६५ कार्यकर्ते शिबिराला उपस्थित होते. ऐनवेळेस खुर्च्यांची जुळवाजुळव करावी लागली. शिबिराला उदंड प्रतिसाद मिळाला. शिबिर संपल्यानंतर जगजित सिंग यांनी मला घट्ट मिठीच मारली. त्यांचा हा अपार स्नेह मी कधीच विसरू शकत नाही. मधुकर धंधरे गुरुजी, अशोक

खोरगडे, विनोद उलीपवार, कविता मते, नलिनी शेरकुरे, मंगेश राऊत यांच्यासह अनेक साथींची भेट प्रेरणादायी ठरली.

परतीची ट्रेन उशिरा म्हणून संजय शेंडे सरांनी मला जेवायला घरीच नेले. घरी जाण्याआधी आम्ही प्रत्यक्ष त्यांची शिक्षणसंस्था बघितली. सर्व सुविधांनीयुक्त, भव्य इमारतींनी वेढलेली, केजीपासून पिजीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था करणारी ही राष्ट्रसेवा दल शिक्षणसंस्था. संजय शेंडे सर सध्या या संस्थेचे नेतृत्व करीत आहेत. ही आपणा सगळयांसाठी किती अभिमानाची गोष्ट! या शिक्षणसंस्थेचा विस्तार शेंडे यांचे वडील ध्येयवेडे आणि समर्पित व्यक्तिमत्त्व दिवंगत केशवराव शेंडे यांनी केला. घरी आईची भेट झाली. वय वर्षे ८०, पण आवाज आणि स्मृती अजूनही खणखणीत. संस्था उभारण्यातील ताण, संकटे, कष्ट याची चर्चा झाली. शेंडे सरांची मुलगी तनया सायकॉलॉजीत ग्रॅज्युएट झालेली. मानवी भावभावना आणि व्यवहार याबद्दल तिच्याशी छान गप्पा झाल्या. सध्या आपल्याच शिक्षणसंस्थेवर करीत असलेला तिच्या प्रयोगाची माहिती मिळाली. तिच्या ज्ञानाचा, अनुभवाचा संघटनेलाही उपयोग होऊ शकतो असे मी तिला म्हणालो. भरपूर गप्पा, भरपेट जेवण आणि भरपूर स्नेह म्हणजे शेंडे सरांकडची भेट होती.

नागपूर माझा शेवटचा सातवा जिल्हा होता. माझा आवाज खणखणीत होता. रोज घरी एकदा फोन व्हायचा. पण पूर्ण सात दिवस मी संघटनामय झालेलो होतो. कुठेच मला थकवा जाणवला नाही. निराशा जाणवली नाही किंवा कंटाळा आला नाही. बस, ट्रॅव्हल्स, ट्रेन, मोटरसायकल, कार, रिक्षा अशा सगळ्या वाहनांनी मी प्रवास केला. यात माझे स्वतःचे कौतुक जराही नाही. आपल्या विदर्भाच्या कार्यकर्त्यांच्या कामाचंच बळ इतकं जबरदस्त आहे, ते बळ आपोआप तुम्हाला मिळत जातं, आपलीच ताकद वाढत जाते, आपणच खूप शिकत जातो, आपणच ऊर्जा घेऊन समृद्ध होत जातो. भरपूर कार्यकर्ते संघटनेसाठी काम करू इच्छितात. त्यांच्यापर्यंत आपण नीट पोहोचण्याची गरज आहे. आपला संघटनेचा विचार, काम करण्याची पद्धत त्यांच्यापर्यंत व्यवस्थित पोहोचण्याची गरज आहे. तेथे उभ्या असलेल्या आपल्या कार्यकर्त्याला आपणच बळ देण्याची गरज आहे. योग्य दिशेने, सातत्याने जर आपण प्रयत्न करीत राहिलो तर एक जबरदस्त संघटन आपण निश्चितपणे उभे करू शकतो. कारण त्यासाठी भांडवल लागतं, समर्पित भावनेने, प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते, हे विदर्भात विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. अशा सगळ्या कार्यकर्त्यांच्या बळावर एक सशक्त संघटन आपण निश्चितपणे उभारू शकू, याबद्दल माझे मन निःशंक आहे. या सर्व कार्यकर्त्यांना मनःपूर्वक सलाम!

**शब्दांकन : विनायक सावळे**

●

---

**(पृष्ठ क्रमांक २८ वरून)**

- शाळाबाह्य असणाऱ्या मुलींना गावातील अंगणवाडी शिक्षिका, आशा वर्कर यांच्याकडून माहिती द्यायला हवी.
- आजही कित्येक महिलांना या संदर्भात माहिती नाही, तेव्हा महिलांसाठी शरीरविज्ञान साक्षरतेचे कार्यक्रम घेऊन याबाबत माहिती द्यायला हवी.

मासिक पाळीबाबत वैज्ञानिक दृष्टिकोनातून जागरुकता केल्यास महिलांचं शारीरिक, मानसिक आरोग्य उत्तम राहील, यात शंका नाही. समाजात मासिक पाळीच्या नावाखाली त्यांचं होणारं शोषण, दुय्यम स्थान कमी होऊन त्यांना सर्व ठिकाणी संधी प्राप्त होतील. या सर्व बाबींवर काम करण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाजाचे प्रबोधन करण्यासाठी ज्या व्यक्ती प्रयत्नरत आहे, त्यांनी आपल्या प्रयत्नांमध्ये आणखी वाढ करण्याची गरज आहे; असंच अनेक संशोधन आणि समाजातील अनेक उदाहरणांतून, घटनांमधून लक्षात येतं. समाजाचा महिलांनी अर्धा भाग व्यापलेला आहे. या अर्ध्या भागाला जर दुय्यम दर्जा दिला जाणार असेल तर खरंच आपण देश म्हणून विश्वशक्ती होऊ शकू का? याबाबत विचार करून आपण सर्व मासिक पाळी संदर्भातील आपली साक्षरता वाढवू या. एक निरोगी समाज घडवू या.

●



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**पर्यावरणपूरक होळी**

**अलिबाग :** रायगड जिल्ह्याच्या वतीने जनजागृती करण्यासाठी पुरणपोळी होळीत न टाकता ती गरिबांना मिळावी म्हणून अलिबाग तालुक्यातील चोंढी आगरसुरे आदिवासी वाडी येथे छोट्या स्वरूपात कार्यक्रम घेऊन पुरणपोळी वाटप करण्यात आले. महिला बचत गटातील सदस्यांचा भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. दहावी व बारावी तसेच शाळेत जाणाऱ्या मुलांना वह्या, पेन, भेट देण्यात आले. नेत्रदान केलेल्या कुटुंबालाही प्रशस्तीपत्र देवून गौरवण्यात आले. या कार्यक्रमात सुरभी संस्था, नितीन राऊत, पानस्कर सर, डवले सर, जेधे मॅडम, तारे मॅडम, श्रद्धा मॅडम इत्यादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**कोराडी :** होळीमध्ये नैवेद्याच्या रूपाने मोठ्या संख्येने पोळ्या टाकल्या जातात. हे वाचविण्याकरिता महा. अंनिसचे कार्यकर्ते सरसावले व विद्युत विहार परिसरातील होळ्यांपर्यंत पोहोचून कार्यकर्त्यांनी शेकडो पोळ्या, गाठी व नारळ संकलित केले. हे खाद्यपदार्थ महाअंनिसचे जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांच्या नेतृत्वाखाली काटोल रोडवरील जीवनधारा मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना वितरित करून पर्यावरणपूरक व व्यसनमुक्त होळी साजरी करण्यात आली. पोळ्या संकलनाकरिता महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे, कार्याध्यक्ष बबन गायकवाड, विलास भालेराव, राजू साळवे, मिनाक्षी सोनटक्के, गुरुदेव सेवा मंडळाचे बाळकृष्ण झाडोकार, राऊत, वाघ, सार्वजनिक दुर्गा उत्सवाच्या अध्यक्षा स्वाती पटले, भूमिता ताजने, पूजा देरकर, सीमा गावनेर, रितू आत्राम, तनु मारबते, स्नेहल लोंढे, उज्वला गंधे, प्रीती नीर, संगीता पट्टे, ख़ुशी साठवणे, ज्योत्स्ना डॅडमल, ऑफिसर कॉलनी सी टाईपच्या वतीने सोनाली वानखेडे, शितल सोरती, मेघा करमरकर, आशा गोपलवार, अर्चना अत्राम, सारिका ठाकरे व पूर्वा मांजरीकर या महिलांनी होळीत नष्ट होणारे अन्न वाचविण्याकरिता सहकार्य केले.

**उलवे :** दि. २४ मार्च, २०२४ रोजी उलवे येथील उन्नती को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी येथे आयोजित 'होळी लहान, पोळी दान' उपक्रम अंतर्गत होली उत्सव साजरा होत असताना महिलांनी उत्स्फूर्तपणे तीनशे ते साडेतीनशे पोळ्या आमच्याकडे दान केल्या. कार्यकर्त्यांनी आदिवासी पाडा साईनगर तसेच जयकुमार इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या लेबर कॅम्पमध्ये जाऊन वाटप केल्या. याकरिता प्रेम सरोदे, ऋषिकेश वाघमारे तसेच विजय साबळे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

**ऊर्जानगर (चंद्रपूर) :** महाअंनिस शाखा, श्री गुरुदेव सेवा मंडळ आणि ऊर्जानगर स्पोर्टिंग क्लब व युवा सोशल फाऊंडेशन ऊर्जानगरच्यावतीने सार्वजनिक पर्यावरणपूरक होळीचे आयोजन करण्यात आले होते. या पर्यावरणपूरक होळीला गिरीश कुमरवार (मुख्य अभियंता) यांचे हस्ते पेटविण्यात आली. सोबतच प्रमुख अतिथीच्या हस्ते समाजातील हिंसाचार, अमानवीयता, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, आतंकवाद, स्त्रीभ्रूणहत्या, व्यसनाधीनता, हुंडाबळी या कुप्रवृत्तीचे होळीत दहन करण्यात आले. होळी दहनानंतर जमा झालेल्या पुरणपोळ्या व इतर साहित्य एकत्र करून त्या वांढरी येथील मुलांच्या अनाथालयात आणि डेबू सावली वृद्धाश्रमात पोहचविण्यात आले. याकरिता युवा कार्यकर्ते किसन अरदळे, दिपक मडावी, भोजराज शिंदे व टीमचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंनिसचे उपाध्यक्ष दुर्रेंद्र गेडाम यांनी, तर आभार कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नारायण चव्हाण (जिल्हा प्रधानसचिव), बाळकृष्ण सोमलकर, संजय जुनारे, शंकर दरेकर, भैयाजी उईके, विजय राठोड, हर्षल मेश्राम, निर्मला चव्हाण, मालू कोंडेकर, मिनाक्षी गेडाम, कविता राजूरकर आदींचे सहकार्य लाभले.

**कोरा :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, उसेगाव येथे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याबाबत महाअंनिसयुवा सहभाग विभाग मंगेश रंजना संतोष याने मार्गदर्शन करून त्यांच्याकडून संकल्पपत्र भरून घेतले. पर्यावरणपूरक होळी साजरी करताना पुरणपोळी जाळण्याऐवजी गरजूंना दान करा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

**रबाळे :** शाखेच्यावतीने नवी मुंबई संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकरनगर रबाळे (नवी मुंबई)

येथे 'होळी लहान करा व पोळी दान करा' या अंनिसच्या उपक्रमांतर्गत मुख्याध्यापक व कार्याध्यक्ष अमोल खरसंबले व प्रधानसचिव अविनाश जाधव, जिल्हा प्रधानसचिव अमोल वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. होळीमध्ये पोळी न टाकता ही गरिबांना दान करणे, त्याचबरोबर नैसर्गिक रंग लावण्याचा संकल्प यावेळी केला.

**बेलापूर :** शाखेतर्फे 'होळी करा लहान, पोळी करा दान' अभियानांतर्गत, होळीत अर्पण होणाऱ्या पोळ्या गरजूंना देण्यात आल्या. हे अभियान रविवार, दि.२४ मार्च, २०२४ रोजी रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील कळंबोली येथे राबविण्यात आले. महा. अंनिसच्या कार्यकर्त्या ज्योती क्षीरसागर यांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला.

**नाशिक :** शाखेच्यावतीने नाशिक शहर तसेच जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालयांतून पर्यावरणस्नेही होळी व रंगपंचमी साजरी करण्याकरिता  जवळपास दहा हजारांहून अधिक संकल्पपत्र भरून घेण्यात आली. पाणी न वापरता कोरड्या वनस्पती रंगांची रंगपंचमी खेळावी, झाडे, लाकडे, गोवऱ्या, प्लॅस्टिक, टायर यांची होळी करण्यापेक्षा स्वतःमधील दुर्गुणांची होळी करावी, होळीच्या ठिकाणी अपशब्द वापरू नयेत, असे आवाहन संकल्पपत्रात विद्यार्थ्यांना करण्यात आले होते. त्याला फार मोठा सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

**लातूर :** या अभियानांतर्गत प्रत्येक व्यक्तीने निसर्गासोबत आपली वाटचाल करून, मानवी समाज आणि सृष्टीचे आरोग्यवैभव संपन्न ठेवावे असे प्रतिपादन, लातूर येथील छत्रपती रा.राजर्षी शाहू महाराज उद्यानामध्ये, आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानामध्ये महाराष्ट्र अंनिसच्या कार्यालयीन विभागाचे राज्यकार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दशरथ भिसे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर यांनी केले. तर सूत्रसंचालन रामकुमार रायवाडीकर यांनी केले. संजय व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी बाळासाहेब जगताप, गंगाधर गवळी, गणेश मलचिमे, अभिजित भुजबळ, नागेश मुंडकर, जी. एन. संगनाळे, श्रीपती शिंदे, सिद्धराम गायकवाड, के. एम. भडीकर, ॲड. सुरेश शिंदे, दिगंबर भोसले, ॲड. आर. व्ही. लोंढे, गोपाळरावतात्या चिकाटे, सूरजभाई पाटील, कबीर राय, आर. एस. गव्हाणे, राजकुमार जाधव, संगमेश्वर वलाकटे, रोझा रायवाडीकर, बीडीओ वसंतराव वाघमारे, माजी सरपंच माधवराव गायकवाड, पत्रकार बाळ होळीकर आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### देहदान व अवयवदान अभियान

**आडगाव सरक :** शाखेच्या वतीने देहदान व अवयवदान सप्ताह नेहरू उद्यान, छ.संभाजीनगर येथून दि. २३ मार्च, २०२४ पासून सुरू करण्यात आला. सात दिवस हा कार्यक्रम राबवण्यात आला. उद्‌घाटनाच्या दिवशी माजी गटशिक्षणाधिकारी डॉ. रमेश धनेगावकर, श्रीमती गीता कोलटकर व भाऊ पठाडे यांनी यथोचित मार्गदर्शन केले व दात्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी करुणा गंगावणे, संदीप भगाडे, मेजर सुखदेव बन, अहमद बेग, अरुण सुरवसे, शेवाळे यादव कुशवाह, वाणी इत्यादिंनी सहभाग नोंदवला.

**घणसोली :** शाखेतर्फे 'देहदान अवयवदान अभियान' राबवण्यात आले. देहदान अवयवदानाच्या माहितीचे फलक व उपस्थितांशी संवाद करून माहिती देण्यात आली. 'मरावे परी अवयवरूपी उरावे' हा संदेश देण्यात आला. अभियान दि. ३१ मार्च, २०२४ रोजी नवी मुंबईतील घणसोली येथे पार पडले. महा.अंनिस कार्यकर्ते प्रदीप कासुर्डे, निधी कासुर्डे, शुक्राचार्य खैरमोडे व अशोक निकम यांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला.

**सानपाडा :** शाखेतर्फे 'देहदान अवयवदान अभियान' राबवण्यात आले. हे अभियान दि. ३० मार्च, २०२४ रोजी नवी मुंबईतील नेरूळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ पार पडले. महा.अंनिस कार्यकर्ते राजेंद्र पंडीत, महेंद्र राऊत व अशोक निकम यांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला.

### संवाद मेळावा

**वाशिम :** येथील स्थानिक औषध निर्माण भवन येथे महा.अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांच्या वाशिम जिल्हा दौऱ्यानिमित्त कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. वाशिम जिल्हा प्रधानसचिव महेश देवळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री विजय शिंदे यांनी संघटनेची पंचसूत्री विविध उदाहरण देऊन अत्यंत सोप्या शब्दात समजावून सांगितली. वाशिम शाखा कार्याध्यक्ष पी. एस. खंदारे यांनी समितीच्या ३३ वर्षांपासूनच्या कारकिर्दीचा आढावा सादर केला. यावेळी समितीच्या स्थापनेपासून विविध स्वरूपाची मदत करून समितीच्या वाढीसाठी मदत करणाऱ्या व सहभाग घेतलेल्या कार्यकर्त्यांचा माधव बावगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर अवयवदान व देहदान करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. राज्यकार्याध्यक्ष माधव बावगे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

प्रथमतः सध्याच्या परिस्थितीमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याची का आवश्यकता आहे? ही भूमिका त्यांनी समजून सांगितली. त्यानंतर द्वितीय सत्रामध्ये वाशिम जिल्ह्यामधील विविध समविचारी संस्था, संघटना व व्यक्ती यांच्याशी मनमोकळा संवाद साधण्यात आला. यावेळी प्रा.अनिल बळी, मधुकर बनसोड, मधुराणी बनसोड, उमेश शेंडे, उपाध्यक्ष जनकराव वायचाळ, बुवाबाजी विभागप्रमुख दत्तराव वानखेडे, युवा विभागप्रमुख प्रा.इस्माईलखा पठाण, सीमा शृंगारे, जयश्री भडांगे, भारत ठोंबरे, प्रधानसचिव महेश देवळे, प्रा.सुभाष अंभोरे आदी सहजिल्ह्यातील बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सखारामजी ढोबळे तर सूत्रसंचालन युवराज राठोड यांनी केले.

**कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर**

**भंडारा :** शाखेच्या वतीने एक दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर दि.३० मार्च, २०२४ ला घेण्यात आले. राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला पोलीस अशोक बागुल, डॉ. संजय मानकर, विष्णुदास लोणारे, नितेश बोरकर, प्रकाश नाकतोडे, प्रा. युवराज खोब्रागडे, प्रा. संजय घोडके, सौ.माया बारापात्रे, सौ. कविता लोणारे, अश्विनी भिवगडे, त्रिवेणी वासनिक, चंद्रशेखर खोब्रागडे, विलास निंबोरकर, चंद्रशेखर भिवगडे आणि मगबुल वारसी आदी उपस्थित होते.

**चंद्रपूर :** शाखेतर्फे कार्यकर्त्यांसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मातोश्री हायस्कूल ताडोबा. रोड तुकूम (चंद्रपूर) येथे दि. २९ मार्च, २०२४ रोजी मुख्य मार्गदर्शक विनायक सावळे (राज्य सरचिटणीस महाराष्ट्र अंनिस) यांनी विविध विषयांवर शिबिरार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिराला पी.एम.जाधव (जिल्हा कार्याध्यक्ष), नारायण चव्हाण (प्रधानसचिव) व मुरलीधर राठोड, देवराव कोंडेकर, दुर्वेंद्र गेडाम, बाळकृष्ण सोमलकर, तुषार चव्हाण तसेच महा. अंनिसमध्ये काम करू इच्छिणाऱ्यांची उपस्थिती होती. शिबिराचा समारोप विलास निंबोरकर (वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प राज्य सहकार्यवाहक), गौरव अळणे (जिल्हा कार्याध्यक्ष महा. अंनिस नागपूर), सूर्यकांत खणके (जिल्हा अध्यक्ष), राजकुमार जवादे (अध्यक्ष बहुजन एम्प्लॉई फेडरेशन ऑफ इंडिया), डॉ.कोसे, बळीराज धोटे (मुख्य संघटक सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट) यांच्या उपस्थितीत शिबिरार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरव आळणे यांचा महा. अंनिस चंद्रपूरच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**संशय जादूटोण्याचा**

**ठाणे :** मुरबाड तालुक्यातील करवळे येथे, एका वृद्धास भुताळ्या असल्याचा संशयावरून त्याला निखाऱ्यांवर जबरदस्तीने उभे केले होते. यात सदर व्यक्ती भाजली होती. याप्रकरणी ठाणे जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांनी ९ मार्च, रोजी सदर पीडिताची भेट घेतली. पोलीस स्टेशनला भेट देऊन गुन्ह्याची व कलमांची माहिती घेत पोलिसांना अर्ज देऊन मांत्रिकाला प्रथम आरोपी करण्यास सांगितले. पोलिसांना कायदेविषयक सहकार्य करण्याचे ॲड. तृप्ती पाटील यांनी आश्वासन दिले. यावेळी विजय परब, परेश काठे, डॉ. सुषमा बसवंत व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

**कुटुंब मेळावा**

**लातूर :** शाखेचा कुटुंब मेळावा सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.१० मार्च, २०२४ रोजी महा. अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते दगडूसाहेब पडिले यांच्या बोरी येथील शेतात संपन्न झाला. यावेळी विवेकवाहिनीच्या राज्यकार्यवाह प्रा. सविता शेटे यांचे व्याख्यान घेण्यात आले. प्रथम सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कुटुंब मेळाव्याची भूमिका जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर यांनी विशद केली. सदर मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थित राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, प्रसिद्ध कवी भारत सातपुते, राज्य सरचिटणीस रुक्साना मुल्ला, राज्य निमंत्रक हरिदास तम्मेवार होते. यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी स्वतःचा परिचय करून दिला. माधव बावगे, कवी भारत सातपुते यांनी मार्गदर्शन केले. मनोरंजन, वाढदिवस, मिक्स जेवण, पडिले कुटुंबीयांच्याकडून शेतात बनवलेला गावरान गुळाचा शिरा, झणझणीत ताकाची कडी, लहान मुलांसाठी घोडेस्वारी असा विविधतेने नटलेला कुटुंब मेळावा संपन्न झाला. यावेळी खासकरून महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी राज्यकार्यवाह दिलीप अरळीकर, बाबा हलकुडे, उत्तरेश्वर बिराजदार, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, हनुमंत मुंडे, प्रा. दशरथ भिसे, बब्रुवान गोमसाळे, साथी दत्ता सोमवंशी, डॉ. गणेश गोमारे, प्रकाश मरतूळे, किसन सोनटक्के, शिंगाडे सर, सुनिताताई अरळीकर, बालाजी कोळी, राहुल लोंढे, रणजित आचार्य, बाबुराव माशाळकर, परमेश्वर बडगिरे, श्रावणकुमार चिद्री, ज्योती ढगे, मंगल बावगे, ललिता दरेकर, अनिता भोसले, अरुणा, वनिता, प्रतीक्षा पडिले, डॉ. सुशीला अशोक नारनवरे, पुष्पा निर्भय कोरे, शीतल गड्डीमे, राजश्री राहुल लोंढे आदी उपस्थित होते. सर्व महिलांनी इच्छा व्यक्त केली की असा कुटुंब मेळावा वर्षातून एकदा

नाही तर दोनदा घेण्यात यावा. असा हा खूपच प्रेरणादायी कुटुंब मेळावा संपन्न झाला.

**स्वयंअध्ययन परीक्षा**

**जामनेर :** शाखेने दि.४ मार्च, २०२४ रोजी जिनिअस इंटरनॅशनल स्कूल, जामनेर मध्ये राज्यस्तरीय स्वयंअध्ययन परीक्षा घेतली. या परीक्षेत सुमारे १४० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेचा निकाल जाहीर करून दि.४ एप्रिल, २०२४ रोजी बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. परीक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. इतर विद्यार्थ्यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महा.अंनिसच्या जामनेर शाखेच्या मानसिक आरोग्य विभागाच्या कार्यवाह डॉ. मोहिनी मोरे यांनी केले. प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह शाखेचे अध्यक्ष जे. डी. पाटील, प्रधानसचिव भीमराव दाभाडे, महिला सहभाग विभाग कार्यवाह शोभा बोऱ्हाडे, जळगाव जिल्हा उपाध्यक्ष नाना लामखेडे, जिल्हा प्रधानसचिव प्रल्हाद बोऱ्हाडे, जिल्हा महिला सहभाग विभाग कार्यवाह सुशीला चौधरी, जिनियस इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य डॉ. दीपक गोसावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिनियस इंटरनॅशनल स्कूलचे उमेश निंबोळकर यांनी, तर आभार श्रीमती मनीषा चौधरी यांनी केले. परीक्षा व कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्कूलचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रबोधन कार्यक्रम**

**शहादा :** तिखोरा गावात अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रबोधनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. उत्तरकार्याच्या निमित्ताने जमलेल्या गावकरी आणि नातेवाईकांच्यासमोर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्रामीण भागातील कार्यक्रमाला नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. पावणे दोन तास झालेल्या कार्यक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संतोष महाजन, रवींद्र पाटील आणि विनायक सावळे यांनी कार्यक्रम सादर केले.

●

**वाचक प्रतिक्रिया**


## बाबासाहेबांचे आचार विचार रूजवण्यासाठी...

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला (१३ एप्रिल) कात्रज पुणे येथे महा. अंनिस पुणे शहर शाखेची बैठक झाली. संवाद, गीते आणि बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका मासिकाच्या एप्रिल २०२४ या अंकातील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने' हा नागसेन कांबळे यांचा लेख वाचण्यात आला. विनोद लातूरकर यांनी या लेखाचे वाचन केले. त्यानंतर त्यावर चर्चा करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक उंची आणि त्यांचे योगदान, अनुयायी आणि भक्त येथील फरक, अलीकडच्या काळातील उत्सवातील वाढलेला खर्च, असे एकंदरीत लेखाचे सूत्र होते. एका बाजूला पुस्तक प्रदर्शन असताना दुसऱ्या बाजूला दणदणाटी आवाजातील डीजे लावलेले असतात आणि तिकडे लोकांचा मोठा ओढा असतो, असा मुद्दा वैशाली कळसाईत यांनी मांडला. ज्यांना बाबासाहेब समजलेले नाहीत ते डीजे लावतात, असा मुद्दा हृदयनाथ मोरे यांनी मांडला. आजही महामानव जातीतच अडकवून ठेवले आहेत, असा मुद्दा संदीप जाधव यांनी मांडला. अनेक बौद्ध लेण्यांचे हिंदूकरण व धार्मिकीकरण झालेले आहे, असे सतीश जाधव यांनी सांगितले. अनेक ठिकाणी बौद्ध समाज हिंदू कर्मकांड आचरत आहेत. बौद्ध वर्गातील एक मोठा वर्ग आध्यात्माकडे वळला आहे. तो वर्ग बुद्ध गया, सारनाथ, लुंबिनि, महू, लखनऊ आदी ठिकाणी जात असतो, असे विशाल विमल यांनी सांगितले. जातीपातीच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून विचार केला पाहिजे, असे मत सीताराम ओव्हाळ यांनी मांडले. आजची तरुणाई जयंती पुण्यतिथी पुरते केवळ महामानवांचा विचार करते, असे अनुज भुजबळ यांनी सांगितले. श्रामनेर प्रशिक्षण पूर्ण केल्यावर बौद्ध तत्वज्ञान आणि आचरण लक्षात येते नाही असे समाधान भगत यांनी सांगितले. आम्ही आमच्या वस्तीत विधायक पद्धतीने जयंती साजरी करत असून एक वही एक पेन लोकांकडून जमा करून ते गरीब मुलांना वितरित करतो, असेही त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या २२ प्रतिज्ञाचे महत्व विषद केले. बौद्ध समाजातील व्यक्तिसोबत आंतरजातीय धर्मीय विवाह केले जातात. मात्र नंतर भेद दिलेली बाबासाहेब आणि बुद्धांची प्रतिमा स्वीकारायला हो- नाही केले जाते. व्यक्तीचे नंतर हिंदुकरण झाले, असे नम्रता ओव्हाळ यांनी सदोहरण सांगितले. किमान सर्व वर्गातील सुशिक्षित, जबाबदार नागरिकांनी बाबासाहेबांचे आचार विचार हे आचरणात आणले पाहिजेत. आज एक मोठा वर्ग असा आहे की, पुस्तके, स्मारके, प्रतिमा यामधून त्यांना प्रेरणा मिळत असते. या सगळ्या छोट्या मोठ्या उपक्रमातून बाबासाहेब आपलेसे करण्यास आणि बाबासाहेबांचे आचार विचार रुजवण्यास मदत होणार आहे, असेही विशाल विमल यांनी सांगितले.

**-विशाल विमल**

# गणितप्रेमी

सूरज उर्मिला सुनील




कागदावरून एकदाही पेन न उचलता आणि आधी काढलेल्या रेघेवरून पुन्हा न गिरवता हे चित्र काढून दाखवा!


हे तुमचंही शाळेतलं आवडतं कोडं असेल ना? भरपूर वेळा प्रयत्न करूनही आपल्याला हे अजिबात सुटत नव्हतं. शेवटी एकतरी सरळ किंवा वक्र रेघ काढताच येत नव्हती. चला, या लेखात आपण गणित वापरून या कोड्याबद्दल चर्चा करूया.

व्यवहारातील एक प्रसिद्ध गणिती थाटाची म्हण आहे, 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल!' (आपण श्राद्धाचे कर्मकांड मानत नाहीत, बरं का!) याचा अर्थ, असा की जर तुम्हाला एक प्रश्न सोडवायला दिला आहे, तर तुम्ही एकतर त्याचं उत्तर काढा किंवा उत्तर काढता येणं अशक्य आहे असं सिद्ध तरी करा. (हो! गणितात अशक्य शब्द असतो, बरं का! पण तुम्ही ते सिद्ध केलं पाहिजे!)

आपल्याला वरचा प्रश्न सुटत तर नाहीये. पण मग कागदावरून पेन न उचलता वरील अटींसह असं चित्र काढणं शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर १७३५ साली ऑयलर नावाच्या गणितज्ञाने शोधून काढले. त्याने काय म्हटले ते पाहू या. या चित्रात अ, ब, क, ड हे असे बिंदू आहेत की, त्यामधून ५ रेघा बाहेर निघतात म्हणून त्याला 'विषम बिंदू' असे नाव देऊ. ई या बिंदूतून चार रेघा निघतात म्हणून त्याला सम बिंदू असे नाव देऊ. ऑयलरने असे सांगितले की, एखाद्या आकृतीमध्ये कितीही सम बिंदू असू देत, पण दोनपेक्षा जास्त 'विषम बिंदू' असतात ती आकृती काढणे अशक्य असते. जर आकृतीमध्ये दोन किंवा दोनपेक्षा कमी 'विषम बिंदू' असतील तरच ती आकृती वरील अटींचे पालन करून काढता येते. असे ऑयलरने बरीच किचकट समीकरणे मांडून सिद्ध केले आहे बरं!

म्हणजेच वर दिलेली आकृती काढता येणं अशक्य आहे. पुढील आकृत्या पेन न उचलता काढून पाहा. तुम्हाला ऑयलरच्या नियमाची प्रचिती येईल.

चला तर मग, 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल' या म्हणीवर आधारित एक कोडे सोडवूया.



कोडे क्र. १६

शेजारील बुद्धिबळाच्या पटावर डाव्या खालच्या कोपऱ्यात घोडा आहे. अडीच घरे चालत वरच्या उजव्या कोपऱ्यात बरोबर १५ चालीत तो जाऊ शकेल का? तुमचे उत्तर हो असेल तर घोडा कसा जाणार हे सांगा? उत्तर नाही असेल तर तसे सिद्ध करा.



तुमचे उत्तर ८२७५२३५०९७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवा.

कोडे क्र. १५ चे उत्तर - C

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. २१

**– उत्तम जोगदंड**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | ७ |
| ■ | ८ | | ■ | | ■ | | ■ | ९ | |
| १० | ■ | | ■ | ११ | | | | ■ | |
| १२ | | ■ | १३ | ■ | ■ | | ■ | १४ | |
| | ■ | १५ | | | ■ | १६ | | ■ | ■ |
| १७ | १८ | ■ | | ■ | १९ | | ■ | २० | |
| ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| २१ | | | | | | | ■ | २२ | |
| | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ |
| २३ | | | ■ | २४ | | | | | ■ |

**आडवे शब्द**

१) सूर्यकेंद्री सिद्धान्त मांडणारा युरोपातील खगोलशास्त्रज्ञ
८) मानवी मृतदेह
९) नुकसान
११) प्रसिद्ध भारतीय भूकंप वैज्ञानिक, कुसाला ****
१२) कधी कधी आकाशातून पावसाबरोबर पडणारे बर्फाचे खडे
१४) संत तुकारामांच्या अभंगांचा संग्रह
१५) सापाची एक प्रजाती
१६) भारतातील प्रसिद्ध वाळवंट
१७) अंधार
१९) अस्वच्छता आणि अंधश्रद्धा यातून निर्माण होणारे महिलांच्या डोक्यावरील केसांचे गठ्ठे
२०) जग भारताला यांचा देश म्हणून ओळखते
२१) देवीच्या रोगावर लस शोधणारा शास्त्रज्ञ
२२) शस्त्रक्रियेपूर्वी रोग्याला ही देतात
२३) कर्मवीर भाऊराव पाटील यांची संस्था, *** शिक्षण संस्था
२४) पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये चंद्र एका रेषेत आल्याने होणारी स्थिती

**उभे शब्द**

२) संग्रह
३) मीठ
४) दोन रस्ते वेगळ्या कोनात एकत्र आल्यास हा निर्माण होतो
५) आपले राष्ट्रगीत लिहिणारे नोबेल परितोषिक विजेते थोर कवी
६) चार बाजूंनी बंदिस्त असलेले ठिकाण, खोली
७) राजा राम मोहन रॉय यांनी ही प्रथा बंद पाडली
१०) बसवेश्वरांनी स्थापन केलेला धर्म
१३) 'आम्ही तुफानातले दिवे' हे गीत लिहिणारे लोकशाहीर
१८) चवदार तळे या ठिकाणी आहे
२०) छत्रपती संभाजीराजे यांनी लिहिलेला ग्रंथ
२१) जमिनीची मोजमाप करण्याचे एकक

**विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. २० चे उत्तर**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १मा | ■ | २म | हा | त्मा | जो | ती | बा | फु | ३ले |
| न | ■ | ह | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | थ |
| ४स | प्त | र्षी | ■ | ५अ | ६क्ष | य | ७उ | र्जा | ■ |
| मि | ■ | धों | ■ | ८व | य | ■ | दं | ■ | ९मा |
| त्र | ■ | डो | ■ | का | ■ | १०पं | च | को | न |
| ■ | ११रा | के | श | श | र्मा | ■ | न | ■ | व |
| १२र | ■ | श | ■ | ■ | ■ | १३ढों | ■ | १४दा | त |
| १५मा | ध | व | रा | १६व | बा | ग | ल | ■ | ■ |
| ई | ■ | क | ■ | ळ | ■ | बा | ■ | १७दि | १८व |
| ■ | १९स | र्वे | क्ष | ण | ■ | २०जी | व | शा | स्त्र |

## अभिवादन



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विज्ञानबोध वाहिनी विभागाचे राज्यकार्यवाह साथी भास्कर सदाकळे यांची मातोश्री श्रीमती बनबाई विठ्ठल सदाकळे (वय ८५ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना महा. अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.



सांगली येथील नामवंत विधितज्ज्ञ, वक्ते, लेखक आणि विविध सामाजिक चळवळींमध्ये हिरीरीने सक्रिय असणारे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सांगली जिल्हा उपाध्यक्ष आणि पुरोगामी चळवळीचे मार्गदर्शक साथी ॲड.के.डी.शिंदे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना महा. अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.

## जटा निर्मूलन



आयटी क्षेत्रात काम करत असलेल्या मुलीच्या आईच्या केसात जट झाली व अनेक वर्षे त्या ते सहन करीत होत्या. सदर मुलीने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पिंपरी चिंचवड शहर शाखेच्या ॲड. मनीषा महाजन यांना संपर्क केला. सदर महिलेच्या कुटुंबीयांशी चर्चा व समुपदेशन करून त्यांच्या मनातल्या शंकांचे निरसन केले. दि.३१ मार्च, २०२४ रोजी क्रांती पोतदार, विकास सूर्यवंशी, गणेश तामचिकर, संजय निकम, सायली पांचाळ व ॲड. मनीषा महाजन यांनी त्या महिलेचे जटा निर्मूलन केले.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे!**

**शाखा : शिरुरताजबंद जि.लातूर**

प्राचार्य डॉ. निळकंठ पाटील
प्रा. दत्तात्रय मारोतीराव माने
प्रा. डॉ. माधव डिगांबर दामाजीवाले
श्री. बाबुराव पंढरीनाथ सयदापुरे
श्री. पांडुरंग बाबुराव चाफेकानडे
श्री. संग्राम देविदास पवार
श्री. दिपक गोविंदराव भराटे

## विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे निमंत्रण

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक शुक्रवार, शनिवार, रविवार दि. ३१ मे व १, २ जून २०२४ रोजी **विजया सांस्कृतिक हॉल, इस्लामपूर (सांगली)** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीसाठी राज्य कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी, राज्य निमंत्रित, सर्व जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिव आणि शाखांचे कार्याध्यक्ष आणि प्रधान सचिव यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**विशेष सूचना :**

• व्यवस्थेच्या दृष्टीने येत असल्याचे आणि कधी पोचणार हे संपर्क व्यक्तींना कळवावे • राज्य पदाधिकारी यांनी आपल्या विभागाचा आणि जिल्हा कार्याध्यक्ष व शाखा कार्याध्यक्ष यांनी आपल्याकडील नाविन्यपूर्ण जो दस्तऐवज असेल तो घेवून यावा. तसेच काहीही अडचण आल्यास खालील कार्यकर्त्यांशी संपर्क करावा.

**निलेश कुडाळकर** – ९०२१८६२२९१, **डॉ. राम घुले** – ७९७२२७४७३४, **डॉ. काशिलिंग गावडे** – ८६००७३२९०१ **अजय भालकर** – ९३५९०८०८२०

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक पाचवा, ५ मे २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 5, 5th May 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

## वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
'विवेक जागर संस्था' या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/–
संस्थेसाठी रु. ५००/–

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.